दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७५ | सोमवार दि.२ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### तरुणांचे स्वप्न की डिजिटल भ्रम?

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६–२७ सादर करताना सरकारने तरुणांना केंद्रस्थानी ठेवल्याचा दावा केला आहे. शिक्षण, संशोधन, रोजगार, क्रीडा आणि क्रिएटर इकॉनॉमीसाठी केलेल्या घोषणा पाहता, भारताला डिजिटल आणि क्रिएटिव्ह महासत्तेच्या दिशेने नेण्याचा सरकारचा प्रयत्न स्पष्ट दिसतो.

# अर्थसंकल्पात कांदा उत्पादकांची फसवणूक!

## शेतकरीविरोधी मानसिकतेचा जिवंत पुरावा, शेतकरी आक्रमक, रस्त्यावर उतरण्याचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर केला. निर्मला सीतारमण यांनी सलग नवव्यांदा देशाचा देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यंदा प्रथमच अर्थसंकल्प रविवारच्या दिवशी सादर झाला आहे. दरम्यान, या अर्थसंकल्पावर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी टीका केली आहे. सादर झालेला केंद्र सरकारचा अर्थसंकल्प म्हणजे कांदा उत्पादक शेतकऱ्यांची थेट आणि उघड उघड केलेली फसवणूक आहे. हा अर्थसंकल्प शेतकरीविरोधी मानसिकतेचा जिवंत पुरावा असल्याची टीका, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केली आहे.

कधीतरी शेतकऱ्यांच्या कांद्याला भाव वाढले की क्षणात कांदा निर्यातबंदी, निर्यातीवर कर आणि विविध अटी, शर्ती लादून शेतकऱ्यांचे उत्पन्न गळा दाबून रोखायचे असे सरकारचे धोरण आहे. आता गेल्या अनेक महिन्यांपासून कांद्याला अत्यल्प बाजारभाव मिळत ▶▶ पान २ वर





















## अग्रलेख

# तरुणांचे स्वप्न की डिजिटल भ्रम?

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ सादर करताना सरकारने तरुणांना केंद्रस्थानी ठेवल्याचा दावा केला आहे. शिक्षण, संशोधन, रोजगार, क्रीडा आणि क्रिएटर इकॉनॉमीसाठी केलेल्या घोषणा पाहता, भारताला डिजिटल आणि क्रिएटिव्ह महासत्तेच्या दिशेने नेण्याचा सरकारचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. पाच विद्यापीठ टाउनशिप, कंटेंट क्रिएटर लॅब्स, गेमिंग-एआय क्षेत्रातील रोजगारनिर्मिती आणि मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे या घोषणा ऐकायला आकर्षक आणि भविष्याभिमुख आहेत. विशेषतः ॲनिमेशन, गेमिंग, डिजिटल मीडिया आणि एआय क्षेत्रात लाखो नोकऱ्यांची स्वप्ने दाखवली जात आहेत.

ग्रामीण भागातील तरुण घरबसल्या जागतिक ब्रँड्ससोबत काम करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शिक्षण आणि कौशल्य यांचा मेळ घालण्याचा हा प्रयत्न स्वागतार्ह म्हणावा लागेल. याशिवाय केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी या अर्थसंकल्पात तरुणांसाठी शिक्षण, संशोधन, रोजगार, क्रीडा तसेच क्रिएटर इकॉनॉमीला चालना देणाऱ्या महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. यात, देशभरात पाच नवीन विद्यापीठ टाउनशिप स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली. या विद्यापीठ टाउनशिपमध्ये शैक्षणिक सुविधा, संशोधन केंद्रे, वसतिगृहे, क्रीडा मैदाने आणि स्टार्टअपसाठी स्वतंत्र जागा एकाच ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना नवकल्पना विकसित करण्यासाठी पोषक वातावरण मिळणार असल्याचे अर्थमंत्री सीतारामन यांचा दावा आहे. २०३० पर्यंत सुमारे २० लाख सोशल मीडिया प्रोफेशनल्स घडविण्याचे उद्दिष्ट असून, देशातील १५ हजार माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्स उभारल्या जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांची आखणी व देखरेख करणार आहे. या अंतर्गत व्हिडिओ एडिटिंग, पॉडकास्टिंग, ग्राफिक डिझाइन, डेटा ॲनालिटिक्स आणि डिजिटल मार्केटिंगचे प्रशिक्षण दिले जाणार असून, यामुळे भारत जागतिक गेमिंग हब म्हणून पुढे येईल, असेही त्यांनी सांगितले. मात्र, या घोषणांवर विरोधकांनी तीव्र टीका केली आहे. काँग्रेससह इतर विरोधी पक्षांनी हा अर्थसंकल्प म्हणजे ''घोषणांचा पाऊस, पण अंमलबजावणीचा दुष्काळ'' असल्याचा आरोप केला आहे. विद्यापीठ टाउनशिप, कंटेंट लॅब्स आणि रोजगारनिर्मितीबाबत ठोस आर्थिक तरतूद, कालबद्ध अंमलबजावणी आराखडा आणि मागील योजनांचे निकाल याबाबत सरकार मौन बाळगत असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. देशात आजही कोट्यवधी तरुण बेरोजगार आहेत. पारंपरिक उद्योग, शेती, लघुउद्योग आणि ग्रामीण रोजगार यांना अपेक्षित चालना मिळालेली नाही, असा आरोप विरोधक करतात. ''सोशल मीडिया प्रोफेशनल्स घडवण्याच्या घोषणा ठीक आहेत, पण हाताला काम नाही, पोटाला अन्न नाही, ही आजच्या तरुणांची खरी समस्या आहे,'' असा घणाघात विरोधी नेत्यांनी केला आहे. मुलींच्या शिक्षणासाठी वसतिगृहांची घोषणा सकारात्मक असली, तरी अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची अवस्था दयनीय असल्याकडेही विरोधकांनी लक्ष वेधले आहे. आधी असलेल्या व्यवस्थेची सुधारणा न करता केवळ नव्या घोषणा करणे म्हणजे आकड्यांची जादू असल्याची टीका होत आहे.

खरे तर, हा अर्थसंकल्प तरुणांसाठी संधी देणारा की आश्वासनांचा फुगा, हे येणाऱ्या काळात ठरेल. सरकारने जर या घोषणांची प्रामाणिक आणि पारदर्शक अंमलबजावणी केली, तर भारताला नवे नेतृत्व मिळू शकते. मात्र, जर या योजना फक्त कागदावरच राहिल्या, तर तरुणांचा भ्रमनिरास होण्याची भीती नाकारता येणार नाही.ङ्गतरुणांचा विश्वास हा कोणत्याही देशाचा सर्वात मोठा भांडवल असतो. तो केवळ घोषणा करून नव्हे, तर प्रत्यक्ष परिणाम दाखवून जपावा लागतोहेच या अर्थसंकल्पातून सरकारसमोर उभे राहिलेले खरे आव्हान आहे.

# जनतेचा आमदार, धैर्याचे प्रतीक: सुरेश (अण्णा) धस

२ फेब्रुवारी २०२६. हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय भूदृश्यावर एक अविस्मरणीय स्थान राखणाऱ्या, जनतेच्या हृदयात अजरामर ठसा उमटवलेल्या नेत्याचा वाढदिवस आहे. सुरेश अण्णा धस - हे नाव घेतल्यावर मनात एका ओजस्वी, निर्भीड, आणि नेहमी जनतेसाठी झगडणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. राजकारण हे केवळ सत्तेचे खेळ नसून सेवेचे ध्येय असलेला हा योद्धा, आजही तळागाळातील माणसाच्या आवाजाचा प्रतिनिधी म्हणून ओळखला जातो.

**सुरुवातीचा प्रवास: सामान्यातून असामान्यतेकडे**

सुरेश अण्णा धस यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला. लहानपणापासूनच समाजातील विषमता, गरिबी आणि शोषण यांना त्यांनी जवळून पाहिले. हाच तो पाया होता ज्याने त्यांच्या मनात समाजबदलाची ऊर्मी निर्माण केली. तरुण वयातच सामाजिक कार्याकडे झुकलेल्या धस यांनी, राजकीय चळवळीत प्रवेश केला तो सत्तेसाठी नव्हे, तर बदलासाठी. त्यांच्या वक्तृत्वशक्तीमध्ये आग होती, तर्कशक्तीमध्ये पाणी होते आणि संघटन कौशल्यामध्ये जमीन आणि जनता यांच्याशी असलेले नाते स्पष्ट दिसत होते.

**राजकीय फलकावर उदय: विधानसभेपर्यंतचा प्रवास**

स्थानिक राजकारणातून त्यांनी आपला प्रवास सुरू केला. आपल्या मतदारसंघातील प्रत्येक गाव, प्रत्येक वस्ती, प्रत्येक घर यांच्याशी थेट संवाद साधणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. केवळ निवडणुकीच्या वेळी नव्हे, तर दररोज जनतेच्या समस्या ऐकणे आणि त्यावर झटपट कारवाई करणे हा त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा गाभा होता. हाच सातत्याने झालेला परिश्रम आणि जनतेशी असलेला अढळ रिश्ता यामुळे त्यांना पहिल्यांदाच विधानसभेवर मोठ्या बहुमताने विजय मिळवता आला. तेव्हापासून ते सलग अनेक वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून येत आहेत, जे जनतेचा त्यांच्यावरील विश्वास दर्शवते.

**विधानसभेतून केलेले योगदान: प्रश्न, भाषणे आणि धाडस**

सुरेश धस हे केवळ संख्येमध्ये असलेले आमदार नाहीत. विधानसभेच्या कार्यकाळात त्यांनी सतत सरकारलासुद्धा आव्हाने दिली आहेत. त्यांचे प्रश्न नेहमीच तपशीलवार, तथ्यांवर आधारित आणि जनहिताशी संबंधित असतात. शेती संकट, पाणीटंचाई, रोजगार, शिक्षण, आरोग्य यासारख्या मूलभूत समस्यांवर त्यांनी केलेली भाषणे राजकीय चर्चेच्या दर्जावर परिणाम करणारी ठरली आहेत. विरोधी पक्षात असतानासुद्धा त्यांनी सतत सरकारच्या चुकीच्या धोरणांवर आवाज उठवला, तर सत्तेत असताना जनतेच्या हितासाठी कार्यप्रणाली सुधारण्याचा प्रयत्न केला. हो सुरेश आण्णा धस यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे धाडस. कोणत्याही गुंतागुंतीच्या मुद्द्यावर बोलण्यास, कोणत्याही शक्तिशाली गटाला आव्हान देण्यास ते कधीही मागे पुढे होत नाहीत. हे धाडस केवळ शब्दांपुरते मर्यादित नसते, तर ते कृतीतही दिसून येते. त्यांनी अनेकदा प्रशासनाला जागे केले आहे, गैरप्रकार विरुद्ध आंदोलने केली आहेत आणि न्याय मिळेपर्यंत झगडले आहेत.

**विकास कार्य: दृष्टी आणि अंमलबजावणी**



राजकारण केवळ टीका करण्यापुरते मर्यादित नसते, तर रचनात्मक कार्य करणेही महत्त्वाचे आहे हे सुरेश अण्णा धस यांना चांगले माहीत आहे. त्यांच्या मतदारसंघात त्यांनी अनेक विकास कार्ये राबवली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, शाळा, आरोग्य केंद्रे, ग्रामीण उद्योग यासारख्या मूलभूत सुविधांवर त्यांनी भर दिला आहे. शिवाय, केवळ हार्डवेअर विकास न करता, सॉफ्टवेअर विकासाकडे म्हणजेच शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास यांकडेही त्यांचे लक्ष आहे. त्यांचा विकासाचा दृष्टिकोन हा समतोल आणि समावेशक आहे.

**संकटकाळातील नेतृत्व: कोविड-१९ आणि नैसर्गिक आपत्ती**

कोविड-१९ सारख्या जागतिक संकटकाळात सुरेश अण्णा धस यांनी आपले नेतृत्व ओजस्वीपणे दाखवले. मतदारसंघातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत मदत पोहोचवणे, ऑक्सिजन, औषधोपचार, अन्नसाहित्य यांची व्यवस्था करणे, लसीकरण शिबिरे घेणे, भीतीग्रस्त लोकांना धैर्य देणे अशा अनेक पातळ्यांवर त्यांनी कार्य केले. तसेच, बरेचदा महाराष्ट्राला पडणाऱ्या पूर, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीतही त्यांनी प्रशासनासोबत समन्वय साधून मदतकार्यात तत्परतेने भाग घेतला आहे. संकटकाळी नेता म्हणून त्यांनी जबाबदारी आणि संवेदनशीलतेचा आदर्श ठेवला आहे.

**राजकीय तत्त्वज्ञान: व्यवहार्यता आणि आदर्शवाद यांचा समन्वय**

आजच्या काळात राजकारण हे अनेकदा आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांच्यातील संघर्ष मानले जाते. सुरेश अण्णा धस यांचे राजकीय तत्त्वज्ञान या दोन्हीचा मेळ घालणारे आहे. ते आदर्शवादी आहेत, पण कठोर वास्तवाची जाणीवही त्यांना आहे. त्यामुळे ते केवळ सिद्धांतावर भाषणे करत नाहीत, तर व्यवहार्य उपाययोजनाही सुचवतात. जनतेचे हित हा त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा, प्रत्येक भूमिकेचा केंद्रबिंदू आहे. पक्षीय राजकारणापेक्षा ते राष्ट्रहित आणि जनहिताला अग्रक्रम देतात, असे अनेक प्रसंगी दिसून आले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणात जेव्हा वास्तविक सेवा, ठोस कार्ये आणि जनतेशी असलेला नैसर्गिक संवाद याची चर्चा होते, तेव्हा आमदार सुरेश आण्णा धस यांचा उल्लेख अपरिहार्य ठरतो. त्यांचा कार्यशैली ही घोषणांपेक्षा कृतीवर, दिखाऊ प्रकल्पांपेक्षा मूलभूत गरजांवर आणि राजकारणापेक्षा समस्यासमाधानावर केंद्रित आहे. खालील मुद्दे हे त्यांच्या या 'कामाच्या राजकारणा'चे साक्षीदार आहेत.

**१. खुंटेफळ साठवण तलाव: पाण्याचे अर्थव्यवस्थेशी असलेले नाते**

खुंटेफळ साठवण तलाव हा ४ टीएमसी क्षमतेचा साठवण तलाव संपूर्ण मतदारसंघाला हरितक्रांतीचे किरण दाखवणारा महत्वकांक्षी प्रोजेक्ट सुरेश आण्णा धस यांनी आज जवळपास पूर्णत्वास आणला आहे. या प्रोजेक्टमध्ये निसर्गावरती अवलंबून न राहता शासनाच्या उपसा सिंचन योजनेमध्ये सिम्पोरा ते खुंटेफळ या उपनलिकेचे नियोजनबद्ध पद्धतीने नियोजन करून पश्चिम महाराष्ट्रातले पाणी मराठवाड्यात मध्ये आणण्याचा धाडस दाखवला आहे. फळबागांसाठीचे (खुंटेफळ) पाणी टिकवणे म्हणजे केवळ सिंचन नव्हे, तर शेतकऱ्यांची उत्पन्नाची सुरक्षितता होय. सुरेश आण्णा धस यांनी केवळ अशा तलावांच्या बांधकामावर भर दिला नाही, तर त्यांच्या योजनेपासून ते भूजल पुनर्भरणापर्यंतच्या संपूर्ण चक्रावर लक्ष ठेवले. यामुळे केवळ पाणी साठले जात नाही, तर शेतीचे रोखपट बदलते आणि फळोत्पादन क्षेत्रात स्थिरता निर्माण होते.

**२. जिल्हा परिषद शाळा: जरेवाडी पॅटर्नचे स्थानिकीकरण**

जरेवाडी पॅटर्न हे शैक्षणिक उत्कृष्टतेचे प्रतीक बनले आहे. सुरेश आण्णा धस यांनी हे केवळ एक 'आदर्श' म्हणून पाहिले नाही, तर त्याचे तत्त्व म्हणजे समुदाय सहभाग, शिक्षकांची जबाबदारी आणि मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर इतर जिल्हा परिषद शाळांमध्ये रुजवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. यामुळे ग्रामीण भागातील शिक्षणाची गुणवत्ता राजकीय भाषणांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्षात सुधारण्याचा मार्ग खुला झाला.

**३. विहीर, घरकुल, शेततळे: स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण**

पाणी व्यवस्थापन ही एकात्मिक संकल्पना आहे. विहीर, घरकुल (स्वच्छता) आणि शेततळे (फार्म पॉन्ड) या तिन्ही गोष्टींवर एकाचवेळी काम केल्यानेच परिणामकारकता येते. सुरेश आण्णा धस यांनी पंचायत समित्यांना केवळ निधीचे वाटप करण्यापुरते मर्यादित ठेवले नाही, तर त्यांना योजना आखण्याची, अंमलबजावणीची आणि देखरेखीची जबाबदारी दिली. हे 'सक्षमीकरण' हाच खरा स्थायी विकासाचा पाया आहे.

**४. नगरपालिका कामे: मूलभूत सुविधांवरील नवा फोकस**

ग्रामीण नगरपालिकांना प्रामुख्याने राजकारणाचे केंद्र मानले जाते. सुरेश आण्णा धस यांनी या धारणेवर आळा घालून, रस्ते, पाणीपुरवठा, साफसफाई, प्रकाशव्यवस्था या मूलभूत कामांवर लक्ष केंद्रित केले. यामुळे नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास वाढला आणि सार्वजनिक निधीचा उपयोग झाला हे लोकांच्या डोळ्यांना दिसू लागले.

**५. अधिवेशनातील वैद्यकीय मदत: राजकारणापलीकडील मानवतावाद**

राजकीय अधिवेशन हे साधारणपणे राजकीय भाषणांचे आणि आरोप-प्रत्यारोपांचे केंद्र बनते. अशा वेळी रुग्ण सेवा आयोजित करणे आणि दिलाशा देणे ही कल्पना मोलाची आहे. याच धरतीवर ते मेडिकलच्या बिलावरती सुरेश अण्णांनी मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्र करीत हे काम केवळ सेवेचे प्रतीक नसून, एक सूचना आहे की राजकारणाचे अंतिम उद्दिष्ट जनतेची सेवा करणे हेच असले पाहिजे. हा मानवी संवेदनशीलतेचा दांडगा पैलू सुरेश आण्णा धस यांच्या कार्यात स्पष्टपणे दिसून येतो.

**६. शेतीपूरक उद्योग: 'स्वतः करून दाखवणे' हे सर्वोत्तम मार्गदर्शन**

शेतकऱ्यांना नवीन उद्योगासाठी फक्त सल्ला देणे पुरेसे नसते. त्यासाठी प्रत्यक्षात तो उद्योग करून, त्यातील आव्हाने आणि यशाचे मार्ग स्वतः अनुभवणे गरजेचे असते. 'स्वतः करून पाहून मार्गदर्शन' हा सुरेश आण्णा धस यांच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. दुग्धव्यवसाय, फलप्रक्रिया यासारख्या उद्योगांमध्ये त्यांनी केलेले प्रायोगिक प्रयत्न शेतकऱ्यांसाठी जिवंत उदाहरण ठरले आहेत.

**७. वर्ग दोन गायरान जमिनीचा गुंतागुंत सोडवणे**

ग्रामीण भागातील हा ज्वलंत मुद्दा सोडवण्यासाठी केवळ न्यायालयीन किंवा शासकीय प्रक्रियेवर अवलंबून राहिले तर तो कायमचा लांबत राहील. सुरेश आण्णा धस यांनी या प्रश्नाला सोडवण्यासाठी अधिवेशनामध्ये आवाज उठवून त्यासाठी नवीन तरतुदी करण्यात यावेत यासाठी शासनाला भाग पाडले . हा वास्तववादी दृष्टिकोन आहे, ज्यात समस्येचे खोडमोड होते आणि तात्पुरते नव्हे तर शाश्वत समाधान निर्माण होण्याची शक्यता असते.

**८. ग्रामीण हिताचे जीआर: प्रशासनाला जनतेकडे ओढणे**

नवीन सरकारी निर्णय (जीआर) काढणे हे शासनाच्या इच्छेचे प्रतीक असते. सुरेश आण्णा धस यांनी शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या हितासाठी नवीन जीआर आणण्यावर भर दिला, याचा एक गुपित हेतू आहे: प्रशासन यंत्रणेचे लक्ष आणि संसाधने ग्रामीण गरजांकडे वळवणे. जीआर हे केवळ कागद नसतो, तो प्राधान्यक्रम ठरवतो.

**वास्तववाद हाच खरा जनआधार**

सुरेश आण्णा धस यांचे कार्य हे एका सुस्पष्ट वास्तववादी राजकारणाचे प्रतिबिंब आहे. यात भविष्यातील स्वप्ने नाहीत, तर वर्तमानातील गरजा आहेत. यात खोखली घोषणा नाहीत, तर जमिनीवरची कामे आहेत. यात आकडेमोडीचे राजकारण नाही, तर संवाद आणि सहभागाचे मार्ग आहेत. ग्रामीण महाराष्ट्राचा विकास हा अशाच जमिनीशी जोडलेल्या, कष्टाने घाम गाळलेल्या आणि जनतेच्या दैनंदिन आयुष्याला स्पर्श करणाऱ्या कार्यातूनच खरोखरी होणार आहे. आणि हेच कार्य सुरेश आण्णा धस सातत्याने पार पाडत आहेत, ज्यामुळे त्यांचा 'आमदार' हा किताब 'कार्यकर्ता' या प्रत्यक्ष अर्थाने साकार झाला आहे.

**तरुण पिढीसाठी प्रेरणा**

सुरेश अण्णा धस यांचे व्यक्तिमत्त्व तरुण पिढीसाठी एक प्रेरणास्थान आहे. सामान्य पार्श्वभूमीतून कष्ट करून, प्रामाणिकपणे राहून, जनतेची सेवा करत महत्त्वाचे स्थान गाठता येते हे त्यांच्या जीवनाने सिद्ध केले आहे. राजकारण हा केवळ धनदौलत किंवा सत्ता मिळवण्याचे साधन नसून, समाजसेवेचे एक माध्यम असू शकतो हे त्यांच्या कार्याने दाखवून दिले आहे. तसेच, निर्भयता, स्पष्टवक्तेपणा, कष्टाळूपणा आणि जनसंपर्क या गुणांनी ते तरुण नेत्यांसाठी आदर्श ठरतात.

**भविष्याची आव्हाने आणि ध्येये**

२ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरेश अण्णा धस यांचा वाढदिवस साजरा करताना, आपण केवळ भूतकाळातील त्यांच्या यशाचा विचार करत नाही, तर भविष्यातील आव्हानांकडेही लक्ष देतो. महाराष्ट्र आणि भारतासमोर अर्थव्यवस्था, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य, शेती, पर्यावरण यासारखे अनेक गंभीर प्रश्न आहेत. या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी सुरेश अण्णा धस सारख्या अनुभवी, ईमानदार आणि जनतेशी जिव्हाळ्याचे नाते असलेल्या नेत्यांची गरज आहे. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र आणि देशाला या आव्हानांचा सामना करता येईल अशी आशा सर्वांना आहे. सुरेश अण्णा धस हे केवळ एक आमदार नाहीत, तर एक विचार, एक चळवळ आणि एक आशेचे प्रतीक आहेत. जनतेच्या आवाजाचा आवाज, शोषितांचे शूर हुतात्मा, आणि विकासाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांनी आपले स्थान निर्माण केले आहे. त्यांचा वाढदिवस हा केवळ एक वैयक्तिक सण न राहता, त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा आणि समाजसेवेच्या भावनेचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. आपण सर्वांनी त्यांच्या आरोग्य, दीर्घायुष्य आणि कार्यशक्तीसाठी शुभेच्छा व्यक्त करूया. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र आणि भारत अधिक प्रगत आणि समृद्ध बनेल, हीच प्रार्थना. ''जनतेचा आमदार, जनतेसाठी आमदार'' हे ब्रीदवाक्य जपणाऱ्या सुरेश अण्णा धस यांचा हा वाढदिवस अनेक वर्षे साजरा व्हो, आणि त्यांचे कार्य भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरो.



**शरद रेडेकर**
पत्रकार आष्टी





आष्टी तालुक्यातील भैरवनाथाचे वाळुंज या ठिकाणी ग्रामस्थांनी ग्रामवर्गणीतून आपल्या पंचक्रोशीतील नव्हे तर सर्व परिसरातील आराध्य दैवत असलेल्या भैरवनाथाच्या मंदिराच्या कमान वेस कलशारोहण सोहळा संपन्न झाला या सोहळ्याच्या प्रमुख उपस्थिती ज्यांच्या हस्ते व महाराजांच्या हस्ते हवन संपन्न झाले असे लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस तसेच या परिसरातील सर्वांचे आबा देविदास आबा धस , सभापती बद्रीनाथ जगताप, जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, अमोल राजे शिंदे बबन अण्णा झांबरे बलभिम खाडे, या गावचे धडाडीचे कार्यकर्ते माजी सरपंच विष्णू खाडे, अशोक राऊत जामगाव चे आर डी शिंदे रघुनाथ शिंदे,बंडु सोले, आदीसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ गावकरी उपस्थित होते

## पान १ वरून...

**अर्थसंकल्पात कांदा**

असल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. कांद्याला मातीमोल भाव मिळतो आहे, तेव्हा या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कवडीचीही तरतूद नाही असे दिघोळे म्हणाले. हा अर्थसंकल्प शेतकरीविरोधी मानसिकतेचा जिवंत पुरावा असल्याची टीका दिघोळे यांनी केली. केंद्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पूर्णपणे वाऱ्यावर सोडले असून, त्यांच्या उत्पादन खर्चाकडे, वाढत्या मजुरीकडे, खत-बियाण्यांच्या महागाईकडे आणि कर्जाच्या ओझ्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली आहे. भाव नियंत्रणाच्या नावाखाली नेहमीच शेतकऱ्यांना बळी देणाऱ्या सरकारने कांदा उत्पादकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. हा अर्थसंकल्प नाही, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अपेक्षांची जाहीर हत्या आहे. शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक थेंबाची किंमत शून्य मानणाऱ्या या धोरणांविरोधात कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे. जर केंद्र सरकारने तात्काळ कांदा उत्पादकांसाठी थेट आर्थिक तरतूद, भाव हमी आणि निर्यात धोरणात स्थैर्य दिले नाही, तर हा संताप रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही असा इशारा दिघोळे यांनी दिला.

**काजू, कोको आणि चंदनाला बळ**

शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता हाय-व्हॅल्यू पिकांकडे वळावे, यासाठी विशेष योजना आखण्यात आली आहे. नारळ, काजू आणि कोकोच्या उत्पादनासाठी विशेष पाठबळ दिले जाईल. अक्रोड आणि पाइन नट्सच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच चंदनासारख्या उच्च-मूल्य वृक्षांच्या लागवडीतून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.

# नगरसेवक ॲड.गोविंद शिराळे पाटील यांना लोक रत्न पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रनिधी**

जिल्हा सत्र न्यायालयातील सुप्रसिद्ध ॲड .तथा देव देश धर्म या साठी सातत्याने लढणारे व लोकांना न्याय मिळवून देणारे मग शहरांमधील नागरिकांना असो किंवा बीड तालुक्यातील त्यांच्या संपर्कात असणाऱ्या लोकांना तसेच बीड जिल्ह्यातील त्यांच्या संपर्कातील लोकांना शासन प्रशासन तसेच न्यायालयाच्या माध्यमातून न्याय मिळवून देणारे असे बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक तथा ॲड.गोविंद शिरोळे पाटील यांच्या उत्कृष्ट कामाच्या बाबतीत लोकशाही पत्रकार संघ व श्री सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन च्या वतीने समाधान व्यक्त करून त्यांना लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले हा लोकरत्न पुरस्कार महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा श्री सोमेश्वर हनुमान महादेव मंदिर फाउंडेशनचे मा श्री अध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या आदेशावरून महाराष्ट्र




राज्य लोकशाही पत्रकार संघाचे सर्वे सर्वा मा श्रीय संस्थापक अध्यक्ष साहेब व लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सौ सुनंदाताई केदार लेडी सिंघम यांच्या हस्ते व प्रमुख प्रशासकीय मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार देऊन नगरसेवक तथा ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना सन्मानित करण्यात आले यावेळी येथे उपस्थित असलेले लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम जी वावळकर सर तसेच बीड जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर साहेब तसेच त्यांचे सहकारी मुंडे साहेब शिंदे साहेब गाडे साहेब व लेडी सिंघम वाहतूक शाखेच्या शेख मॅडम तसेच लोकशाही पत्रकार संघाचे जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर प्रकाश गाडे पत्रकार किशोर कुलकर्णी लोक लाडक्या बियांचे बाजीराव ढाकणे साहेब तसेच पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी व बीड शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तेव्हा लोक रत्न पुरस्कार सोहळा मोठ्या आनंदामध्ये आणि थाटामाटा मध्ये संपन्न झाला एडवोकेट गोविंद शिराळे पाटील बीडचे स्वीकृत नगरपालिकेचे नगरसेवक यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील उत्कृष्ट कार्यास सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा देण्यात आल्या

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### स्व. अजीतदादा यांना खो-खो खेळाडूंकडून भावपूर्ण श्रद्धांजली

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष, महाराष्ट्रातील तमाम खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक, क्रीडा संघटक, कार्यकर्ते यांना प्रेरणा, आशीर्वाद पाठबळ देणारे तसेच आश्रयदाते व राजकारणातील निर्भीड दिलेल्या शब्दाला अंतिम स्वरुप देणारे स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय पटशिष्य शाळेतील शेवटचे वर्गनायक म्हणून ओळखले जाणारे आमच्या हृदयस्थानी असणारे स्व. अजित दादा पवार साहेब यांना बीड जिल्हा खो-खो असोसिएशन व साई गणेश क्रीडा मंडळ यांच्या वतीने खो-खो क्रीडांगणावर खो खो खेळाडू व प्रशिक्षक यांच्या वतीने साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी खो-खो चे राष्ट्रीय प्रशिक्षक प्रा. डॉ. तानाजी आगळे सर, महिला प्रशिक्षिका प्रा. सौ. चित्रा आगळे, विद्यापीठ खेळाडू प्रा. रवी शिंदे, श्री. अनिल मोरे, डॉ. शितल थोरात व आजी-माजी खो-खो खेळाडू बहुसंख्येने उपस्थित होते



### वडवणीचे धस दांपत्य विदेश दौऱ्यावर

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील नामांकित असणारे साई आशीर्वाद ट्रेडर्सचे सर्वेसर्वा मालक युवा उद्योजक तथा वडवणी मार्केट कमिटीचे संचालक श्री.रणजीत भैय्या धस यांचे आई-वडील श्री.मधुकररावजी धस गुरुजी व सौ. जिजाबाई मधुकरराव धस हे ( यु.ए.ई. )मधील कतार या देशाला रविवार दि.०१ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथील इंटरनॅशनल एअरपोर्ट वरून रवाना झाले आहेत.सिमेंट उद्योगातील नामांकित कंपनी अल्ट्राटेक सिमेंट यांनी या परदेशी दौऱ्यासाठी त्यांची निवड केली आहे.



सविस्तर माहिती अशी की,वडवणी शहरातील सिमेंट व स्टील बांधकाम साहित्यामध्ये प्रसिद्ध असणारे धस कुटुंब विदेशी दौरा करणारे प्रसिद्ध कुटुंब आहे आतापर्यंत युवा उद्योजक रणजीत भैय्या धस यांनी जवळपास २० देशांचे दौरे वेगवेगळ्या एजन्सीच्या माध्यमातून त्यांनी केलेले आहेत तसेच त्यांनी आपल्या आई-वडिलांनाही जवळपास ०८ देशांचे दौऱ्यावर पाठवले होते आज दि.०१ /०२ /२०२६ रोजी मुंबई येथील इंटरनॅशनल एअरपोर्ट वरून श्री. मधुकररावजी धस गुरुजी व त्यांच्या सौभाग्यवती जिजाबाई मधुकर धस हे धस दांपत्ये दोहा या कतार देशाच्या राजधानीसाठी रवाना झाले आहेत व पुढील ०५ दिवस ते तेथील वेगवेगळ्या पर्यटन स्थळाला भेटी देणार आहेत या दौऱ्यासाठी त्यांना माजी आमदार केशवराव आंधळे तसेच नातेवाईक, मित्रमंडळी ,पत्रकार ,कुटुंबाच्या वतीने आनंददायी आणि सुखाच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत..

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली मंथन प्रज्ञाशोध परीक्षा

पाटोदा । प्रतिनिधी

**सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी,या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवार रोजी मंथन अकॅडमी अहिल्यानगर संचलित मंथन प्रज्ञाशोध ही परीक्षा पार पडली.**



## तालुक्यातील २९१ विद्यार्थ्यांचा सहभाग

पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज विद्यालय केंद्रावर तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे. सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने मागील ६ वर्षांपासून मंथन प्रज्ञाशोध ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात.

या परीक्षांमध्ये भाषा गणित,बुद्धिमत्ता,इंग्रजी अशा विषयांमध्ये परीक्षा होते.

पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना भाषा, गणित,इंग्रजी आणि परिसर अभ्यास असा एकच पेपर तर तिसरी ते आठवी च्या विद्यार्थ्यांना भाषा गणित,बुद्धिमत्ता, इंग्रजी,विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ७५ प्रश्न संख्या असलेले दोन पेपर असतात. पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना १५० गुणांची तर तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ३०० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज / महिला महाविद्यालयात ही परीक्षा दिली. या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होते; चांगला प्रतिसाद

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी,त्याची तयारी व्हावी यासारख्या उदात्य हेतू घेणारे पहिले पाऊल

म्हणून मंथन ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि केंद्रस्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत. पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

-प्रा.सोमीनाथ खंडागळे,
परीक्षा समन्वयक पाटोदा

# प्रभु विश्वकर्मा हे जगाचे निर्माणकर्ता शामसुंदर महाराज कासापुरीकर

माजलगांव । प्रतिनिधी





प्रभु विश्वकर्मा भगवान यांच्या जयंतीनिमित्त माजलगांव शहराजवळील नवीन भाटवगाव येथील ज्ञानेश्वर नगर येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध कीर्तनकार शामसुंदर महाराज कासापुरीकरयांचे प्रेरणादायी कीर्तन दि. ३१ जानेवारी रोजी उत्साहात पार पडले.

कीर्तनादरम्यान शामसुंदर महाराजांनी प्रभु विश्वकर्मा भगवान हे संपूर्ण विश्वाचे निर्माणकर्ता असून सृष्टीरचनेत त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी प्रभु विश्वकर्मा भगवान यांचे जीवनकार्य, उत्पत्ती, त्याग, कर्तृत्व तसेच समाजासाठी दिलेले अमूल्य योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच समाजाने धर्मकार्यात एकत्र येऊन सामाजिक ऐक्य जपावे, व्यसनांपासून दूर राहावे, मोबाईल व इतर अपायकारक सवयी टाळाव्यात, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. यासोबतच पर्यावरण संवर्धनासाठी ''झाडे लावा, झाडे जगवा'' तसेच व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारा अशी जनजागृतीही कीर्तनातून करण्यात आली.या कीर्तनप्रसंगी श्रीकृष्ण महाराज यादव, रमाकांत महाराज हरकाळ, बाबुराव म. रत्नपारखी, नारायण म. थोरात, शालवीताई चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर पांचाळ (आमसुले) होते.हा कार्यक्रम श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटना व श्री विश्वकर्मा विठ्ठलरुक्मिणी मंदिर प्रतिष्ठान, माजलगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमास परिसरातील नागरिक, समाजबांधव व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कीर्तनाचा लाभ घेतला.

### संत गुरु रविदास व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत रविदास महाराज व संत कंकैय्या महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव ०१ फेब्रुवारी रोजी वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकानी उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहरप्रमुख धनंजय सोळंके, आझाद क्रांती सेनेचे राजेश घोडे, विलास नेमाने, अविनाश जावळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, कमलेश जाब्रस, उमेश जेथलिया, हरिष यादव,

पुरूषोत्तम करवा,ज्योतीराम पांढरपोटे,अमर साळवे, बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, धनंजय माने, यांचेसह अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी बाजार समितीचे सचिव तथा जयंती अध्यक्ष हरिभाऊ सवणे जयंतीचे मार्गदर्शक, आयोजक, निमंत्रक व सर्व जयंती कमिटीने परिश्रम घेतले.

# वडवणीकरांच्या वतीने अजितदादांना अश्रू नयनांनी श्रध्दांजली

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अकाली निधनानंतर वडवणी तालुक्यातील सर्वपक्षीय व नागरिकांच्या वतीने येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ शनिवार रोजी शोकसभा आयोजीत करण्यात आली होती.






यावेळी संपूर्ण राजकीय - नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी - गहिवरल्या भावनेने लाडक्या दादांना श्रध्दांजली वाहण्यात आली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात नेहमी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेने राजकीय, सामाजिक व शासकीय कर्तव्य पार पाडले. त्यांच्या निधनाने राज्य शासनाने एक कर्तव्यदक्ष, शिस्तबध्द आणि वक्तशीर नेतृत्व गमावले आहे अशी भावना याप्रसंगी प्रत्येकाच्या तोंडून व्यक्त होत होती. निश्चितपणे अजितदादांच्या अशा अकाली जाण्याने एका युगाचा अंत झाला असून विशेषतः बीड जिल्हावासियांसाठी

अजितदादांच्या जाण्याने एका युगाचा अंत

ही खुप मोठी हानी आहे. जेंव्हापासून अजितदादांनी पालकमंत्री म्हणून बीड जिल्ह्याची सूत्रे आपल्या हाती घेतली होती. तेंव्हापासून संपूर्ण बीड जिल्हावासियांना विकासाच्या आशेचा नवा किरण दिसला होता. मात्र याला आता समस्त बीड जिल्हावासिय हे कायम चे मूकलेले आहेत. यावेळी उपस्थित सर्वपक्षीय, सामाजिक कार्यकर्ते यांनी दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करण्यात येवून त्यांना हे दुःख पेलण्याचे बळ लाभो, अशी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी वडवणी तालुक्यातील सर्वपक्षीय राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित असलेल्या सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून व दिवंगत अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन श्रध्दांजली अर्पण केली. व पसायदान म्हणून या शोकसभेची सांगता करण्यात आली.

### रासेयो शिबिरातून स्वच्छतेची जनजागृती; 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी महाविद्यालय, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिवणी येथे सुरू असलेल्या सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' हा उपक्रम शुक्रवारी उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी गावातील रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर तसेच विविध भागांची स्वच्छता करून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती केली.




यावेळी विद्यार्थ्यांनी सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व ग्रामस्थांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी गावाजवळील नदी स्वच्छ करून जलसंवर्धनाचा संदेश दिला. नदी परिसरातील कचरा व गाळ काढून नदी स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच शोषखड्डे व पाझर खड्डे तयार करून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याबाबतही जनजागृती करण्यात आली.

ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक करत उत्स्फूर्त सहकार्य केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुनील जोंधळे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा.सुरेश वाघमारे, प्रा.श्वेता वंजारे, प्रा. वृषाली लोखंडे, प्रा. सुप्रिया ससाणे तसेच प्रा.रंजना जोगदंड यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे सर्व स्वयंसेवक मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या मोहिमेत सहभागी झाले होते.

# ग्रामीण पोलिसांच्या दोन जुगार अड्ड्यावर धाडी

बीड । प्रतिनिधी

**पोलिस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवैध जुगार पत्ते खेळणारे लोकांवर कारवाई या कारवाईत नऊ जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून जवळपास तीन लाखाचा माल जप्त करण्यात आला आहे.**

दिनांक ३०/०१/२०२६ रोजी पोनि अंशोक मुदिराज यांचे मार्गदर्शानाखाली सोबत, पोह/मनोज जोगदंड, पोह/रविंद्र झुनगरे, पोअ/युवराज पवार, संतोष कोटुळे, प्रभाकर जाधव असे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत गुप्त बातमी दारा मार्फत मिळालेल्या खात्रीलायक माहितीचे आधारे पांडुरंग पेट्रोलपंपाचे समोर मोकळयाजागेत लिबांच्या झाडाखाली तळेगाव शिवार ता.जि. बीड येथे दुपारी ०३.४५ वा. सु. १) धर्मराज नाना घाडगे २) नानासाहेब आश्रुबा येवले ३) रावसाहेब अहिलाजी चौरे ४) अंगद बाबासाहेब घोलप ५) अर्जुन देवराव वनवे सर्व रा. बीड हे विनापरवाना बेकायदेशीररित्या पत्त्यावर तिर्रट नावाचा जुगार पैसे लावुन खेळत व खेळवित असताना तिर्रट जुगाराचे साहित्य पत्ते, रोख रक्कम व ०३ मोटार सायकल असा १,५५,७६०/- रुपयाचे मालासह मिळुन आले म्हणुन युवराज आनंदा पवार, पोअ/१९५६, नेम-पोलीस ठाणे, बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन मिळुन आलेले ०५ ईसमाविरुध्द पोलीस ठाणे बीड ग्रामीण गुरनं. ३६/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच आज दि.३१/०१/२०२६ रोजी पोनि अशोक मुदिराज यांचे मार्गदर्शानाखाली सोबत पोह/ जगदीश करांडे, पोह/मनोज जोगदंड, पोह/विजय जाधव, पोह/संतोष जायभाये, पोह/सोमनाथ जायभाये असे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत गुप्तबातबातमीदारा मार्फत मीळाले खात्रीलायक माहितीचे आधारे कान्होबाचे टेकडीजवळ पालवन शिवार ता.जि.बीड येथे संध्याकाळी १७.३० वा. सु. १) सागर रामहरी मस्के, २) गणेश बाबासाहेब खंडागळे ३) बाळकृष्ण विश्वनाथ प्रभाळे सर्व रा. पालवन ता.जि.बीड ४) दिलीप पप्पु पवार, वय-३२ वर्ष रा. नवगण राजुरी ता.जि.बीड बीड ह.मु. गोरे वस्ती बीड ता. जि.बीड विनापरवाना बेकायदेशीररित्या पत्त्यावर झन्ना-मन्ना नावाचा जुगार पैसे लावुन खेळत व खेळवित असताना झन्ना-मन्ना जुगाराचे साहित्य पत्ते, रोख रक्कम व ०४ मोटार सायकल असा १,६७,७००/- रुपयाचे मालासह मिळुन आले म्हणुन जगदीश कचरु करांडे, पोह/ ११५७, नेम-पोलीस ठाणे, बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन मिळुन आलेले ०४ ईसमाविरुध्द पोलीस ठाणे बीड ग्रामीण गुरनं. ३९/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील दोन्ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा पवार मॅडम यांचे मार्गदर्शनाखाली पोनि अशोक मुदिराज, पोह/ मनोज जोगदंड, पोह/रविंद्र झुनगरे, पोह/जगदीश करांडे, पोह/विजय जाधव, पोह/संतोष जायभाये, पोह/सोमनाथ जायभाये, पोअ/युवराज पवार, संतोष कोटुळे, प्रभाकर जाधव यांनी केली. यापुढेही पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीत चोरुन लपुन चालणारे अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे.










cmyk

# चार वर्षांत पहिल्यांदाच सोयाबीनच्या दरात विक्रमी वाढ

## बाजारात हमीभावापेक्षा मिळतोय अधिक दर

लातूर / प्रतिनिधी

लातूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनच्या दरात लक्षणीय वाढ झाल्याने बाजारात चैतन्य निर्माण झाले आहे. सध्या बाजार समितीत दररोज १५ ते १८ हजार क्विंटल सोयाबीनची आवक होत असून, प्रतिक्विंटल सुमारे ५ हजार ९०० रुपये दर मिळत आहे. हा दर शासकीय हमीभावापेक्षा सुमारे ५०० रुपये अधिक असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळत आहे.

सोयाबीनच्या दरात वाढ झाल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भरून निघण्यास मदत होत आहे. खुल्या बाजारात हमीभावापेक्षा अधिक दर मिळत असल्याने आणि रोख स्वरूपात व्यवहार होत असल्याने शेतकऱ्यांचा कल बाजार समितीकडे वाढला आहे. अनेक शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी केंद्रावर नोंदणी केली असली तरी सध्या अधिक दराच्या अपेक्षेने ते बाजार समितीतच विक्री करत आहेत.

यामुळे शेतकऱ्यांना तत्काळ पैसे मिळत असून, आर्थिक अडचणी कमी होत आहेत. दरम्यान, राशीनंतर बहुतांश शेतकऱ्यांनी सोयाबीनची बाजारात विक्री केली. त्यांना प्रतिक्विंटल ३ हजार ते ३ हजार २०० रुपये दर मिळाला. पावसात सोयाबीन भिजल्याने जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम झाला. एकीकडे दर मिळाला नसल्याने उत्पादन खर्चही पदरी पडला नाही. आता ८० टक्के शेतकऱ्यांकडील सोयाबीन विक्री झाल्यानंतर दरात वाढ झाल्याने याचा फायदा नेमका कुणाला, असा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे, यापूर्वी सोयाबीनची साठवणूक करून ठेवलेल्या व्यापाऱ्यांना दरवाढीचा मोठा फायदा होत आहे. मागील काही महिन्यांत कमी दरात खरेदी केलेले सोयाबीन आता जास्त दराने विक्री करता येत असल्याने व्यापाऱ्यांच्या नफ्यात वाढ झाली आहे. बाजारात वाढलेली आवक आणि चांगली मागणी यामुळे व्यवहारही वेगाने होत आहेत. दरवाढीमुळे बाजार समितीत वर्दळ वाढली असून, हमीभाव खरेदी केंद्रांपेक्षा खुल्या बाजारात व्यवहार अधिक होताना दिसत आहेत. आगामी काळात आवक आणि दर दोन्ही स्थिर राहतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सोयाबीनच्या दरवाढीमुळे शेतकरी आणि व्यापारी दोघांनाही दिलासा मिळाला असून, लातूर मार्केट यार्डातील वातावरण सकारात्मक झाले आहे.



### हमीभाव खरेदी केंद्रांकडे पाठ

राज्य शासनाने सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. खुल्या बाजारापेक्षा चांगला दर असल्याने अनेक शेतकऱ्यांनी नोंदणीची किचकट प्रक्रिया पूर्ण केली. आता मात्र खुल्या बाजारात सोयाबीनचे दर वाढत असल्याने नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनी पाठ फिरविली असल्याचे दिसून येत आहेत. सध्या शेतकऱ्यांचा ओढा बाजार समितीकडे अधिक आहे.

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या पाठपुराव्याला मोठे यश!

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतील रेशीम उद्योजक शेतकऱ्यांच्या अनुदानात वाढ

सिरसाळा : नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा क्रमांक २ मध्ये रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्यात आली आहे. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी राज्य शासनाला काही दिवसांपूर्वी पत्र दिले होते. ज्यामध्ये शासनाने शेतकऱ्यांच्या अनुदानात वाढ करावी अशी विनंती केली होती. पोखरा विभागाने संबंधित विभागाने रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानात २.२० लाखांवरून ३.२५ लाख एवढी वाढ करण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, राज्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने पोखरा योजनेच्या अंतर्गत २.२० एवढे अनुदान देण्यात येत होते. ज्यामध्ये शेतकऱ्यांना पूर्व मशागत, तुती रोपांची लागवड, संगोपन, शेडची उभारणी, अळ्यांचे संगोपन करणे अशी सर्वच कामे करावी लागत. सदरील अनुदान अत्यंत तोकडे पडत होते, ज्यामुळे त्यातून किमान खर्चही होणे शक्य नव्हते. सदरील बाब लक्षात घेता रेशीम उत्पादक शेतकऱ्यांनी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांच्याकडे काही महत्त्वपूर्ण गरजा व्यक्त केल्या होत्या. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाकडून तोडगा काढण्यात यावा व रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानात ४.२ लक्ष रुपये एवढी वाढ करावी अशी मागणी करण्यात आली होती. यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, कृषिमंत्री, मुख्य सचिव, कृषी सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी निवेदन देण्यात आले होते. त्यापूर्वीही अनेकवेळा सदरील मागणी शासनाकडे करण्यात आली होती. सदरील मागणीची तत्काळ दखल घेत अनुदानात वाढ करण्यात आल्याने शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती आली तरच देश सुदृढ आणि सक्षम होईल असा मला ठाम विश्वास वाटतो. पारंपरिक शेती ही तोट्याची असल्याने शेतकरी कर्जाच्या खाईत जात आहेत. पारंपरिक शेतीपेक्षा फळबाग लागवड ही नेहमीच शाश्वत उत्पन्न देणारी ठरत असल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकरी त्याकडे वळत आहेत. त्याचबरोबर रेशीम शेतीही शाश्वत उत्पन्न देणारी शेती आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करून सहज सुलभ शासकीय योजनांचा शेतकऱ्यांना लाभ घेता यावा यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट सतत प्रयत्न करत आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या उपस्थितीतील शेतकरी संवाद मेळाव्यातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न शासन दरबारी मांडले आहेत. टप्प्या टप्प्याने एक एक प्रश्न सोडवून घेण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू अशी भावना ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी व्यक्त केली.

# अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची थेट सौदी अरेबियात एन्ट्री!

पुणे : अलिबाग तालुक्यातील पांढऱ्या कांद्याने यंदा शेतकऱ्यांना दिलासा दिला असून या कांद्याला आता परदेशातूनही मागणी वाढताना दिसत आहे. कार्ले, खंडाळे, नेहुली, ताडगाव यांसारख्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात आली होती. भात कापणी पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात या कांद्याची लागवड झाली होती. सध्या हा कांदा पूर्णपणे तयार झाला असून शेतांमध्ये काढणीचे काम जोरात सुरू आहे.



तालुक्यात सुमारे ३०० हेक्टर क्षेत्रावर पांढऱ्या कांद्याची शेती करण्यात आली आहे. हवामान अनुकूल राहिल्यामुळे कांद्याची वाढ चांगली झाली असून उत्पादनही समाधानकारक मिळत आहे. अलिबागचा पांढरा कांदा चविष्ट, टिकाऊ आणि दर्जेदार असल्यामुळे त्याला स्थानिक बाजारपेठेसह बाहेरील राज्यांतूनही चांगली मागणी असते.

यंदा तर थेट परदेशातून, विशेषतः सौदी अरेबियातून या कांद्याला मागणी आल्याची माहिती समोर येत आहे. एका कंटेनर कांद्याची निर्यात होण्याची शक्यता असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या कांद्यामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना रोजगार मिळत आहे. कांदा काढणी, सुकवणे आणि माळा तयार करणे या कामांसाठी मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज भासत आहे. विशेषतः महिलांना या कामातून उत्पन्नाचे साधन मिळत असून घराजवळच रोजगार उपलब्ध होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी एक ते दोन एकर क्षेत्रात कांद्याची लागवड केली आहे, तर काही शेतकऱ्यांनी अगदी दोन ते तीन गुंठ्यांमध्येही कांदा घेतला आहे.काही कुटुंबांनी घराशेजारी परसबाग म्हणून कांद्याची लागवड केली असून स्वतःचा घरखर्च भागवण्यासोबत अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग निवडला आहे.

कमी भांडवलात चांगले उत्पन्न मिळत असल्यामुळे पांढरा कांदा हा अनेकांसाठी फायदेशीर पीक ठरत आहे. कांदा सुकवून त्याच्या माळा तयार केल्यानंतर तो बाजारात विक्रीसाठी पाठवला जात आहे.रायगड जिल्ह्यातील स्थानिक बाजारपेठांसह मुंबई आणि पुणे येथील व्यापारी मोठ्या प्रमाणावर अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची खरेदी करत आहेत. चांगला दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांचा उत्साह वाढला आहे. योग्य दर आणि निर्यातीची संधी कायम राहिल्यास पुढील हंगामात कांद्याच्या लागवडीत आणखी वाढ होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करत आहेत. अलिबागचा पांढरा कांदा आता केवळ स्थानिक नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारातही आपली चव दाखवू लागल्याचे चित्र आहे.

# झेंडूवरील 'निओहायडॅटोथ्रिप्स' फुलकीड

महाराष्ट्रासह देशातील महत्त्वाचे फुलपीक असलेल्या झेंडू या पिकावर सर्वसाधारणपणे फुलकिडींच्या (थ्रीप्स) फ्रँक्लिनिएला ऑक्सिडेन्टॅलिस, स्किर्टोथ्रिप्स डॉर्सॅलिस, थ्रिप्स टॅबॅसी, इ. प्रजातींचा प्रादुर्भाव आढळतो. मात्र या वर्षी झेंडू पिकावर निओहायडॅटोथ्रिप्स समायंकुर याही फुलकिडीचा प्रादुर्भाव निदर्शनास आला आहे. ही कीड पानांवर खरडून रसशोषण करते. परिणामी, पानांवर रुपेरी किंवा फिकट रंगाचे ओरखडे, रेषा, पानांचा वाकडेपणा दिसून येतो. कालांतराने पीक अशक्त बनते, वाढ खुंटते व एकूण उत्पादनात लक्षणीय घट होते.

किडीची ओळख : या किडीची पिलावस्था आकाराने अतिशय लहान, फिकट पिवळा ते केशरी रंगाची असते. डोके गुळगुळीत असून त्यावर कोणतेही तपकिरी डाग आढळत नाहीत. शृंगिकांची लांबी डोक्याच्या लांबीपेक्षा किंचित जास्त म्हणजेच सुमारे १ ते १.२ पट असते. या अवस्थेत किडीस पंख नसतात; मात्र इतर सर्व अवयव प्रौढांसारखेच पण आकाराने लहान असतात. शरीराच्या वरच्या बाजूस लहान, रुंद व चपटे काट्यासारखे केस (सेटी) असून त्यावर सूक्ष्म काटे आढळतात.

जीवनक्रम : या किडीचे जीवनचक्र अंडी, पिलावस्था, पूर्वकोषावस्था व कोषावस्था अशा क्रमाने पूर्ण होते. मादी कीड पानांच्या उतींमध्ये अंडी घालते. अंड्यातून बाहेर पडलेली पिले सक्रियपणे अन्न ग्रहण करीत वाढतात. वाढीच्या काळात पिल्ले कात टाकून दोन इनस्टार अवस्था पूर्ण करतात. त्यानंतर पूर्वकोषावस्थेत प्रवेश करतात. पूर्वकोषावस्थेनंतर कीड कोषावस्थेत जाते. ही कोशावस्था प्रामुख्याने जमिनीत पूर्ण होते. कोषावस्थेतून पूर्ण वाढलेली प्रौढ कीड बाहेर पडते. या किडीचे संपूर्ण जीवनचक्र साधारणतः १५ ते ३० दिवसांत पूर्ण होते. अनुकूल परिस्थितीत वर्षभरात या किडीच्या अनेक पिढ्या विकसित होतात.



नुकसानीचे स्वरूप : या किडीची पिले व प्रौढ अवस्था प्रामुख्याने कोवळ्या पानांवर तसेच पानांच्या देठाच्या कडेला खरडून, त्यातून बाहेर पडणारा रस शोषतात. या प्रक्रियेमुळे पानांवर डाग पडतात. पानांचा रंग फिकट होतो किंवा त्यावर चकाकदार (चांदीसारखे) पट्टे दिसू लागतात. पानांवर फिकट रंगाचे ओरखडे, रेषा व पानांचा वाकडेपणा दिसून येतो. याशिवाय पानांच्या पृष्ठभागावर किडीच्या काळ्या रंगाच्या विष्ठेचे सूक्ष्म थेंबही स्पष्टपणे दिसून येतात. सततच्या रस शोषणामुळे पिकाची एकूण शारीरिक वाढ खुंटते, झाडे अशक्त व कमकुवत बनतात. परिणामी कळ्या व फुलांची संख्या कमी होते, फुलांची गुणवत्ता खालावते. अंतिमतः एकूण उत्पादनात लक्षणीय घट होते. व्यवस्थापन : उन्हाळ्यात खोल नांगरणी करून जमिनीत लपलेल्या किडीच्या विविध अवस्थांचा नाश करावा. लागवडीसाठी केवळ कीडमुक्त, निरोगी व सशक्त रोपांचीच निवड करावी. रोपे शक्यतो संरक्षित नेट हाउसमध्ये किंवा जाळीदार संरचनेत तयार करावीत. पिकाची फेरपालट करताना झेंडू किंवा इतर यजमान नसलेल्या पिकांची निवड करावी. पिकाची अतिदाट लागवड टाळावी.

पिकामध्ये आंतरपीक म्हणून मका किंवा ज्वारी यांचा समावेश केल्यास किडीचा प्रादुर्भाव कमी राहतो. शेती व बांधावरील बाभूळ, रानवांगे, रामतुळस इ. पर्यायी यजमान तणांचा वेळोवेळी नायनाट करावा. पिकास नत्रयुक्त खतांची अतिरिक्त मात्रा टाळावी. संतुलित खत व्यवस्थापन करावे. पिकाच्या पानांच्या उंचीवर निळ्या रंगाच्या चिकट सापळ्यांचा सर्वेक्षणासाठी वापर करावा. शेतातील उपयुक्त मित्रकीटकांचे संवर्धन करावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कडुनिंबयुक्त कीटकनाशकांची फवारणी उपयुक्त ठरू शकेल.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय तटरक्षक दल दिवस

### महत्वाच्या घटना

१६२६ : आजच्या दिवशी पहिला चार्ल्स इंग्लंड चा राजा बनला.
१८४८ : कॅलिफोर्निया गोल्ड रश सोने मिळवण्याच्या उद्देशाने चिनी स्थलांतरितांचा पहिला जथा कॅलिफोर्नियात दाखल झाला.
१८६३ : आजच्या दिवशी शंभू नाथ पंडित हे कोलकत्ता उच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधीश बनले.
१९०१ : आजच्या दिवशी राणी विक्टोरिया चा अंतिम संस्कार करण्यात आला.
१९३३ : ॲडॉल्फ हिटलरने जर्मनीची संसद बरखास्त केली.
१९४३ : दुसरे महायुद्ध स्टॅलिनग्राडच्या लढाईनंतर जर्मनीचे सैन्य सोवियेत संघाला शरण, जर्मन सैन्याच्या माघारीची सुरूवात
१९५२ : आजच्या दिवशी भारताला पहिल्या कसोटी सामन्यात विजय मिळाला.
१९५७ : गोवा मुक्तीसंग्राम - नानासाहेब गोरे, मधू लिमये, जगन्नाथराव जोशी यांची गोव्यातील तुरूंगातुन मुक्तता.
१९६२ : ४०० वर्षांनंतर नेपच्यून व प्लूटो यांची युति
१९७१ : इदी अमीन हे युगांडाचे सर्वेसर्वा बनले.
१९७१ : इराणमधील रामसर येथे पाणथळ भूमीचे महत्त्व या विषयावर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. मानवी जीवनातील पाणथळ भूमीचे महत्त्व समजावे म्हणून दरवर्षी २ फेब्रुवारी हा दिवस जगभर 'जागतिक पाणथळ भूमी दिन' म्हणून साजरा केला जावा असा त्या परिषदेत निर्णय घेण्यात आला.
२००६ : महात्मा गांधी नरेगा कायदा आजच्या दिवसापासून २०० जिल्ह्यांमध्ये लागू केल्या गेले.
२०१३ : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी अमेरिकेत राहत असेलेल्या एका विदेशी शास्त्रज्ञाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : स्वामी श्रद्धानंद - स्वामी दयानंदांचे शिष्य, गुरुकुल विश्वविद्यालयाचे संस्थापक, शिक्षणमहर्षी आणि आर्य समाजाचे प्रसारक (मृत्यू: २३ डिसेंबर १९२६)
१८८४ : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर - ज्ञानकोशकार. 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. (मृत्यू: १० एप्रिल १९३७ पुणे)
१८८७ : प्रसिद्ध राजनीतितज्ञ तसेच समाजसेविका अम्रित कौर यांचा जन्म.
१९०५ : ॲन रँड - जन्माने रशियन असलेल्या अमेरिकन लेखिका व तत्त्ववेत्त्या (मृत्यू: ६ मार्च १९८२)
१९१५ : प्रसिद्ध भारतीय लेखक खुशवंत सिंह यांचा जन्म.
१९१६ : त्रिपुरा चे माजी मुख्यमंत्री दसरथ देब यांचा जन्म.
१९२३ : ललित नारायण मिश्रा - केंद्रीय रेल्वे मंत्री, गृह राज्यमंत्री, अर्थ राज्यमंत्री, पहिल्या, दुसर्या व पाचव्या लोकसभेचे सदस्य, राज्यसभा खासदार (मृत्यू: ३ जानेवारी १९७५ समस्तीपूर, बिहार)
१९७० : संसद च्या सदस्य प्रज्ञा सिंग ठाकूर यांचा जन्म.
१९७९ : शमिता शेट्टी - अभिनेत्री
१९८९ : भारतीय अभिनेत्री संदीप धार यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०७ : दिमित्री मेंदेलिएव्ह - रशियन रसायनशास्त्रज (जन्म: ८ फेब्रुवारी १८३४)
१९१७ : महर्षी अण्णासाहेब पटवर्धन - लोकमान्य टिळकांचे स्नेही आणि विख्यात वैद्य यांनी देहत्याग केला. (जन्म: ४ मे १८४७)
१९३० : वासुदेव गोविंद आपटे - लेखक, भाषांतरकार, पत्रकार, संपादक, अनुवादक, निबंधकार व शकार. त्यांनी लहान मुलांसाठी 'आनंद' हे मासिक सुरू केले होते. (जन्म: १२ एप्रिल १८७१)
१९४१ : हिंदी भाषेतील प्रसिद्ध साहित्यकार तसेच निबंधकार आचार्य रामचंद्र शुक्ला यांचे निधन.
१९६० : हिंदी भाषेतील प्रसिद्ध लेखक आचार्य चतुरसेन शास्त्री यांचे निधन.
१९७० : बर्ट्रांड रसेल - ब्रिटिश गणितज्ञ, तत्त्वज्ञ आणि इतिहासकार (१८ मे १८७२)
१९८२ : राजस्थान चे माजी मुख्यमंत्री मोहन लाल सुखाडीया यांचे निधन.
१९८७ : ॲलिएस्टर मॅकलिन - स्कॉटिश साहसकथा लेखक (जन्म: २१ एप्रिल १९२२)
२००७ : विजय अरोरा - हिन्दी चित्रपट आणि टीव्ही अभिनेता (जन्म: २७ डिसेंबर १९४४.

# द्राक्ष-लागवडपूर्व माती व पाणी परीक्षण करणे गरजेचेच



द्राक्ष लागवडीपूर्वी (किमान १ वर्ष आधी) माती व पाणी परीक्षण करणे दर्जेदार उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या जमिनीमध्ये द्राक्ष लागवड करणार आहोत, तेथील मातीमध्ये मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे नेमके प्रमाण किती आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे, सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ताही जाणून घेतली पाहिजे.

लागवडपूर्व माती व पाणी परीक्षण : बऱ्याच बागेमध्ये चुनखडीचे प्रमाण कमी अधिक आढळून येते. या चुनखडीच्या उपलब्धतेमुळे वेलीस अन्य अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर मर्यादा येतात किंवा खंडित होतो. परिणामी, वेलीचे उत्पादन कमी राहते. काही परिस्थितीमध्ये वेलीचे आयुष्यही कमी होते. बऱ्याच ठिकाणी बोअरवेल व विहिरीचे पाणी सिंचनासाठी वापरले जाते. अशा पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. पाण्यातील अधिक क्षारांमुळे वेलीची शाकीय वाढ होत नाही, तर काही स्थितीमध्ये पानांवर स्कॉर्चिंग येते. यामुळे उत्पादनामध्ये घट येते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या स्थितीमध्ये योग्य खुंटाची निवड महत्त्वाची असते. याकरिता लागवडीपूर्वी माती व पाणी तपासून घेणे गरजेचे समजावे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जि.प.प्रा.शाळेत आयोजित जल्लोषला गावकऱ्यांचा प्रतिसाद

## बक्षिसातून ९० हजार रुपये मिळाले

अंबड । प्रतिनिधी

तालुक्यातील दाढेगाव येथील जि.प.प्रा.शाळेच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित विविध गुणदर्शनाचा 'जल्लोष' कार्यक्रम मोठ्या उत्साहात तसेच गावकऱ्यांच्या प्रचंड प्रतिसादात संपन्न झाला.यावेळी विद्यार्थ्यांच्या प्रत्येक नृत्याला दाद देत गावकऱ्यांनी दिलेल्या बक्षिसापोटी शाळेला तब्बल ९०,४९० रुपयांची रक्कम जमा झाली. या कार्यक्रमाचे उदघाटन समाजभानचे अध्यक्ष दादासाहेब थेटे यांच्या हस्ते झाले.यावेळी पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे यांची तर प्रमूख पाहूणे म्हणून अंबड तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जिगे,सरपंच आप्पासाहेब गव्हाणे योग शिक्षक गणेश मिरकड,पत्रकार अॅड. मोहन रोटे, शालेय समिती अध्यक्ष राजू काकडे, तंटामुक्ती अध्यक्ष शाम साळवे,उपाध्यक्ष अशोक दहिभाते, केंद्र प्रमुख निवास बर्वे,आदर्श शिक्षक गोधाजी कापसे, ह.भ.प लाड महाराज,किरण सानप, पांडूरंग बडे,संदिप सातपूते,संजय थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रास्ताविकात मुख्याध्यापिका श्रीमती बारगजे यांनी कार्यक्रमाचा उद्देश तसेच शाळेच्या गुणवत्तेची माहीती दिली.कार्यक्रमाचे ऊदघाटक दादासाहेब थेटे यांनी गावकऱ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देत आपण नको त्या गोष्टीसाठी वेळ देतो तसेच पैसा खर्च करतो मात्र आपले आपल्या भविष्याकडे म्हणजे मुलांकडे लक्ष नाही. गावातील शाळेतच तुमच्या मुलांचे भविष्य दडलेले असून देवाच्या मंदिराप्रमाणेच ज्ञान मंदिराकडे म्हणजे शाळेकडेही लक्ष देण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी गावात वाचनालय,स्पर्धा परिक्षेच्या तयारीबाबतही उपक्रम सुचवत केवळ मार्गदर्शनच केले नाही तर शाळेच्या विकासासाठी १० हजार रुपये भेट देऊन लोकानांही शाळेच्या प्रगतीसाठी भरीव योगदान देण्याचे आवाहन केले. यावेळी आदिनाथ ढाकणे यांनी या रंगतदार कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होत गावकऱ्यांनी आनंद घेतला.यावेळी युवा ऊद्योजक किशोर लगड यांनी स्टेजसाठी ५ हजार रुपये, भुमिपूत्र तथा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गोधाजी कापसे यांनी शाळेसाठी १५ हजार रुपये मदत दिली. कार्यक्रमांदरम्यान सर्वच शिक्षणप्रेमी गावकऱ्यांनी मदत केली विशेष म्हणजे सोमनाथ सुर्यवंशी, नारायण कापसे,कदिर सय्यद,सनी पवार, वाराजी मुधळे आदी गावकऱ्यांनी प्रत्येक गाण्याला मदत दिली तर शालेय समितीचे अध्यक्ष राजू काकडे, उपाध्यक्ष अशोक दहिभाते,सर्वांनी प्रत्येकी एक हजार रूपये अशी १२ हजार रूपयाची मदत शाळेला दिली.



## नाना रेसीडेन्सी येथील रोहाऊस मध्ये वेश्या व्यवसायावर छापा

जालना। प्रतिनिधी

अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षास गुप्त माहितीवरून मिळालेली माहिती जालना ते मंठा जाणारे बायपास रोड वरील नाना रेसीडेन्सी येथील रो हाऊस मध्ये मालक प्रताप हसनराव लहाने हे स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्या रो हाऊस मध्ये महीलांना आणुन त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करीत आहे.

खात्रीलायक बातमी मिळाल्या बरुन सदर माहीती बाबत मा. पोलीस अधिक्षक यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या सुचनेप्रमाणे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रभारी अधिकारी व स्टाफचे अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी छापा टाकला असता, रो हाऊस मध्ये आरोपी ,रो हाऊस चे मालक प्रताप लहाने रा. जालना ते मंठा जाणारा रोड वरील नाना रेसीडेन्सी रो हाऊस मनोज सातभाई रा. बाजार गल्ली टेंभुर्णी ता. जाफ्राबाद असे ०५ पीडीत महीलांसह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यात रोख २३,२००/- रु असा मुद्देमाल मिळुण आला आहे. त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना येथे महीलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ कलम ३,४,५,६ प्रमाणे प्रभारी अधिकारी अ.मा.वा.प्र.कक्ष पोउपनि गणेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी, (स्थागुशा) यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारो पोउपनि गणेश शिंदे, श्रेणी पोउपनि रवी जोशी, श्रेणी पोउपनि संजय गवळी, पोहेकों कृष्णा देठे, महिला अंमलदार संगिता चव्हाण, आरती साबळे व चालक पोलीस अंमलदार संजय कुलकर्णी, तसेच पोलीस ठाणे तालुका जालना येथील पोहेकों आर्य, पोकों विशाल काळे, वसंत धस यांनी केलेली.

## थोडक्यात




### बँकेच्या सीडीएममध्ये १२ हजारांच्या बनावट नोटा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

बँकेच्या सीडीएम (कॅश डिपॉझिट मशिन) मध्ये १२ हजार रुपये किमतीच्या बनावट नोटा आढळून आल्याने आर्थिक व्यवहारांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा प्रकार २९ जानेवारी रोजी गारखेडा परिसरात असलेल्या आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या मशीनमध्ये उघडकीस आला. या प्रकरणी पुडंलिकनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गारखेडा परिसरातील गजानन महाराज मंदिर रोडवरील आयडीएफसी फर्स्ट बँकेचे शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत असलेले नीलेश महेश शिंधीकर (४०) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले की, २९ जानेवारी रोजी सकाळी कॅशियर समाधान ठोंबरे यांनी सीडीएम मशिनमधील कॅश तपासणीदरम्यान ५०० रुपयांच्या नऊ नोटा बनावट असल्याचे निदर्शनास आणून दिले. बँकेच्या अंतर्गत नियमांनुसार एटीएम विभागाकडून संबंधित व्यवहाराची तपासणी करण्यात आली. तपासात सीडीएम मशिनमध्ये २७ जानेवारी रोजी रात्री ७.५८ वाजेच्या सुमारास कलीम खान याच्या खात्यात १२ हजार रुपये जमा करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे समोर आले.

### कारला आग, पाचजण थोडक्यात बचावले

संभाजीनगर। प्रतिनिधी



सिल्लोड तालुक्यात आग लागल्याने कार जळून खाक झाली. तर चालकाच्या प्रसंगावधानामुळे कारमधील पाचजण थोडक्यात बचावले. ही घटना शनिवारी (दि. ३१) सायंकाळी सात छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावरील पालोद फाट्याजवळील पुलावर घडली. कारमधून क्र. (एम एच- २८, सीए- ७७०७) नंदन खेडेकर, अशोक खेडेकर, सुशीला खेडेकर, अंजली मगर व बाळू डोईफोडे (सर्व रा. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) हे जळगावहून देऊळगाव राजाकडे जात होते. पालोद फाट्याजवळील खेळणा नदी पुलावर अचानक कार बंद पडली. त्यानंतर इंजिनमधून धूर निघू लागल्याचे लक्षात येताच चालकाने तत्काळ कारमधील लोकांना बाहेर काढले. तर यादरम्यान कारला आग लागली. काही क्षणात आगीने रौद्रावतर धारण केल्याने कार जळून खाक झाली. माहिती मिळताच सिल्लोड ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक लहू घोडे, पोलिस हेडकॉन्स्टेबल रामेश्वर जाधव, सतीश पाटील, दीपक इंगळे, वैजिनाथ चव्हाण यांनी धाव घेतली. तर सिल्लोड नगरपरिषदच्या अग्निशामक दलाच्या गाडीला पाचारण करून आग विझवण्यात आली. दरम्यान, महामार्गावर कारला आग लागल्याने वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. तर कारला लागलेल्या आगीचे लोळ पाहून परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कारची आग विझवल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. या घटनेने महामार्गावरील वाहतूक जवळपास तासभर ठप्प झाली होती.

## सामान्य जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारा अर्थसंकल्प - रावसाहेब दानवे

जालना। प्रतिनिधी



केंद्रशासनाने सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरत आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पाणी, आरोग्य व शिक्षण यांसाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करत पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्यात आले असून विकसित भारताच्या दिशेने दमदार पाऊल टाकण्यात आले आहे. कृषी व शेतीपूरक उद्योग क्षेत्राला बळकटी देणारे निर्णयही या अर्थसंकल्पात दिसून येतात.

युवकांसाठी कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि उद्योगांना चालना देण्यावर भर देत देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने केंद्र सरकारने ठोस पावले उचलली आहेत. देशात ७ नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा करण्यात आल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. एकंदरीत, सर्वसमावेशक विकासाचा संदेश देणाऱ्या या अर्थसंकल्पाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, पंतप्रधान मा. नरेंद्रभाई मोदी आणि अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांचे यासाठी अभिनंदन करण्यात येत आहे.

## विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प-भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

शहरीकरणाला नियोजनबद्ध करून, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा



व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल.

मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरासाठी वाढीसाठी होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज (१ फेब्रुवारी २०२६) देशाचा अर्थसंकल्प सादर करत विकास, उद्योग आणि आत्मनिर्भरतेवर भर दिला. या बजेटमध्ये दुर्मिळ खनिज उत्खनन, औषधनिर्मिती व बायोफार्मा क्षेत्राला चालना, सेमीकंडक्टरसाठी मोठी तरतूद, तसेच केमिकल पार्क आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. कॅन्सर (कर्करोग) आणि मधुमेहाची () औषधे स्वस्त करण्याची मोठी घोषणा करण्यात आली आहे. या जीवनरक्षक औषधांवरील कर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ज्यामुळे सामान्य नागरीकांना यांचा खुप उपयोग होणार आहे, असे मत भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केले.

## जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

जालना। प्रतिनिधी

जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा इयत्ता नववी व अकरावीसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी निवड चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र जारी आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज सादर केले आहेत, ते आता ://../२०२५ या अधिकृत संकेतस्थळावरून आपले प्रवेशपत्र प्राप्त करू शकतात. तरी परीक्षेसाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षक व मुख्याध्यापकांनी याची नोंद घ्यावी. तरी उमेदवारांना जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या दिवशी कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी प्रवेशपत्रावर दिलेल्या परीक्षा केंद्राचे ठिकाण, वेळेची माहिती आणि सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करावे, असे आवाहन अंबा-परतूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी.पवार यांनी केले आहे.

## कृत्रिम दंत रोपणातून गमावलेल्या दातांचे पुनर्वसन शक्य

लातूर। प्रतिनिधी

आधुनिक दंत वैद्यकशास्त्रात कृत्रिम दंत रोप-णाच्या माध्यमातून गमावलेल्या दातांचे तसेच संपूर्ण मुखाचे पुनर्वसन करणे शक्य झाले आहे. या उपचार-पद्धतीमुळे रुग्णांचे बोलणे, चावणे, निखळ हास्य व चेहऱ्याचे सौंदर्य पुन्हा प्राप्त होऊ शकते, असे प्रतिपादन एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभाग प्रमुख डॉ. सुषेन गांजरे यांनी केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील कृत्रिम दंत रोपण विभागाच्या वतीने राष्ट्रीय कृत्रिम दंत रोपण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी डॉ. भूषण बांगर, डॉ. शशी पाटील, डॉ. शितल वाघ, डॉ. बालाजी मुंडे, डॉ. योगेश नागरगोजे, डॉ. प्रणोती चिंचनसुरे, डॉ. शारदा झाडके, डॉ. प्रतिक्षा सोमवंशी हे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सुषेन गांजरे म्हणाले की, सतत गोड पदार्थांचे सेवन, तंबाखू आणि चुकीच्या दंतसाफाईमुळे दात किडणे, हलणे किंवा गळून पडणे वाढले आहे. यावर उपाय म्हणून आधुनिक दंत उपचारांमध्ये कृत्रिम दात बसवले जातात. डेंटल इम्प्लांट्स पद्धतीमध्ये जबड्यात स्क्रू बसवून पक्के दात बसवले जातात, ज्यामुळे शेजारच्या दातांना इजा होत नाही. हे दात नैसर्गिक दातांप्रमाणे कार्य करतात. डेंटल इम्प्लांट्सविषयी असलेले गैरसमज चुकीचे असून ही उपचार-पद्धती सुरक्षित, दीर्घकाळ टिकणारी व आता परवडणारी आहे. एमआयडीए-सआर दंत रुग्णालय येथे अत्याधुनिक दंत रोपण सुविधा उपलब्ध असून गरजू रुग्णांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. गांजरे यांनी केले. यावेळी विविध शैक्षणिक आणि सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. साबणावर कोरीव काम, स्केच, रील आणि मीम स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## फटाके फोडल्याच्या वादातून झालेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू

वसमत। प्रतिनिधी

घरासमोर फटाके का फोडले, या किरकोळ कारणावरून झालेल्या वादात एका ३० वर्षीय तरुणाला झाडाला दोरीने बांधून काठीने निघृण मारहाण करण्यात आली. या जबर मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाला असून, ही धक्कादायक घटना वसमत तालुक्यातील डोणवाडा येथे शुक्रवारी रात्री घडली. याप्रकरणी कुरुंदा पोलिसांनी बाप-लेकावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.

कैलास स्वामी (वय ३०, रा. कुरुंदा) असे मृत तरुणाचे नाव आहे. कैलास शुक्रवारी रात्री आपल्या मित्रासोबत दुचाकीवरून डोणवाडा येथे गेला होता. तेथे त्याने बालाजी तमेवार याच्या घरासमोर फटाके फोडले. कुटुंबियांना माहिती मिळताच त्यांनी कैलासला बेशुद्ध अवस्थेत कुरुंदा येथील रुग्णालयात हलवले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक खंदारे आणि त्यांच्या पथकाने रात्रीच डोणवाडा गाठून आरोपी बालाजी तमेवार व होनाजी तमेवार यांना बेड्या ठोकल्या. विलास स्वामी यांच्या तक्रारीवरून कुरुंदा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## दुचाकीला लाथ मारून खाली पाडले; सराफ व्यापाऱ्याकडून ७ लाखांचे दागिने लुटले

हिंगोली। प्रतिनिधी

तालुक्यातील कापडसिंगी ते रिसोड मार्गावर धानोरा शिवारात सराफा व्यापाऱ्याच्य दुचाकीला लाथ मारून पाडल्यानंतर तीन चोरट्यांनी त्यांच्याकडील सुमारे ७ लाख रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने असलेली बॅग पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वाशीम जिल्ह्यातील लोणार येथील सराफा व्यापारी सुरेश कंधारकर यांचे कापडसिंगी येथे सोन्याचांदीचे दुकान आहे. शुक्रवारी चार वाजण्याच्या सुमारास भावाचा निरोप आल्यामुळे ते दुकानबंद करून दुचाकी वाहनावर कापडसिंगी येथून दुचाकी वाहनावर रिसोडकडे निघाले होते. दरम्यान, कापडसिंगी पासून काही अंतरावर धनोरा शिवारात पाठीमागून दुचाकीवर येणाऱ्या तिघांनी त्यांना थांबण्याची सुचना केली. मात्र अनोळखी व्यक्ती पाहून ते थांबले नाही. त्यामुळे दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या दचाकीला लाथ मारून खाली पाडले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे सुरेश घाबरून गेले. त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ते रस्त्याच्या खाली जाऊन पडले. चोरट्यांपैकी एकाने त्यांना चाकूचा धाक दाखविला त्यांच्याकडील सोन्या चांदीचे दागिने असलेली बॅग ताब्यात घेतली अन तिघेही दुचाकीवर फरार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, दीपक मस्के, जमादार सुभाष चव्हाण, जीवन मस्के, टी. के. वंजारे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने तीन पथके स्थापन करून चोरट्यांच्या शोधात रवाना केली आहे शोधासाठी व्यापक शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक निरीक्षक रविकिरण खंदारे करीत असून, अद्याप आरोपी अटक झालेले नाहीत. भरदिवसा घडलेल्या या धाडसी लुटीमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## भूजल व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक - पुजार

धाराशिव। प्रतिनिधी

भूजल व्यवस्थापन हे केवळ एका विभागापुरते मर्यादित न राहता सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातूनच प्रभावीपणे राबविले गेले पाहिजे. केंद्रीय भूजल विभाग व भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या डेटाबेसचा समन्वित आणि व्यापक वापर केल्यास जिल्हास्तरीय नियोजन अधिक परिणामकारक होऊ शकते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी केले.

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय भूजल विभाग, पुणे यांच्या वतीने शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या मौल्यवान माहितीचा स्थानिक भूजल व्यवस्थापन प्रकल्पांमध्ये प्रभावी वापर व्हावा, या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज केंद्रीय भूजल विभागाच्या भूजल माहिती भांडार तसेच जलधर नकाशाकरण अभ्यास प्रकल्पांचे उपयोग या विषयावर जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष व अतिरिक्त पोलीस अधीक्षक शफकत आमना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. मैनाक घोष यांनी भूजलविषयक विश्वासार्ह व अद्ययावत माहितीचा ग्रामस्तरीय जलसुरक्षा योजना तयार करताना प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. तर वरिष्ठ भूजल वैज्ञानिक डॉ. उपेंद्र धोंडे यांनी राष्ट्रीय जलधर नकाशाकरण व डेटा पोर्टल प्रणालींच्या उपयोगावर तांत्रिक सादरीकरण केले. या प्रसंगी कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा या कॉफी टेवल पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ | ६













































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# बॉडी जळाली, पण कागदपत्रं तशीच राहिली, ऐनवेळी दोन्ही पायलट का बदलले? घातपात झाला का याची चौकशी करा; रुपाली पाटलांची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवारांच्या विमान अपघाताच्या आदल्या दिवशी अनेक घडामोडी घडल्या, त्यामुळे त्यांच्या विमान अपघातामागे काही घातपात आहे का याची चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे (ठींश्रिळ झरींळश्र ढहेलरीश) यांनी केला. अपघाताच्या दिवशी ऐनवेळी दोन्ही पायलट का बदलले असा प्रश्नही त्यांनी केला. विमान अपघातात बॉडी जळाली, पण कागदपत्रं तशीच राहिली, त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी आम्ही पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडे करणार आहोत असं रुपाली पाटील ठोंबरे म्हणाल्या.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी विमान अपघात झाला. त्यामध्ये त्यांच्यासह इतर पाच जणांचा मृत्यू झाला. आता त्या विमान अपघातावरुन संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाचा तपास केंद्रीय संस्थेने तसेच सीआयडीनेही सुरू केला आहे. अजित पवारांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त करत रुपाली पाटील ठोंबरे म्हणाल्या की, आज पाच दिवस झाले, आमचा मेंदू बधीर झाला आहे. अजित पवार सकाळी ८ वाजता ज्या विमानाने येणार होते, त्याचे पायलट आणि को पायलट दोघेही ट्रॅफिकमध्ये अडकले आणि ऐनवेळी बदलले गेले. ते का करण्यात आलं? विमान खाली घेण्याची सूचना कुणी केली? आधी सहा माणसं या विमानात असल्याचं सांगितलं गेलं. मृत्यू पाच जणांचा झाला. मग सहावा माणूस कुठे गेला? रुपाली पाटील म्हणाल्या की, लँडिंगच्यावेळी अडचणी असताना ते विमान खाली घेण्याची सूचना कुणी दिली? अडचण असेल तर ते विमान पुणे, सोलापूर किंवा इतर ठिकाणी उतरवायला हवं होतं. मात्र तसं न करता बारामतीमध्येच का उतरवलं?

विमान अपघातात सगळ्या बॉडी जळाल्या, पण कागदपत्रं तशीच राहिली. त्यामुळे हा अपघात आहे की त्यामागे काही कटकारस्थान आहे याची चौकशी झालीच पाहिजे. आपण हा अपघात असल्याचं म्हणू आणि दुसरीकडे ज्याने हे कटकारस्थान केलं आहे तो मोकाट सुटायला नको असं रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या.

अजितदादांचा अपघात ही संपूर्ण महाराष्ट्राची मोठी हानी आहे. त्यामुळे हा अपघात आहे की घातपात? हा प्रश्न फक्त रुपाली पाटील ठोंबरेंचा नाही, प्रत्येक महाराष्ट्रातील व्यक्तीचा आहे. त्यामुळे याची चौकशी करावी अशी मागणी रुपाली पाटील यांनी केली.

# पतीच्या त्रासाला कंटाळून विवाहितेने दोन चिमुरड्यांसह संपवले जीवन

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पाबळ परिसरातून एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. पतीच्या सततच्या त्रासाला आणि चारित्र्याच्या संशयाला कंटाळून एका ३० वर्षीय विवाहितेने आपल्या पाच वर्षांच्या मुलासह आणि अवघ्या चार महिन्यांच्या चिमुरडीसह विहिरीत उडी घेऊन जीवनयात्रा संपवली. रविवारी (दि. १) दुपारी थोरस्थळ वस्ती येथील विहिरीत या तिघांचेही मृतदेह आढळून आले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे.

अहिला ऊर्फ भाग्यश्री राजू जाधव (वय ३०) असे मृत महिलेचे नाव असून, सार्थक (५ वर्षे) आणि अवघ्या चार महिन्यांची चिमुरडी गौरी या निष्पाप मुलांचाही या घटनेत अंत झाला आहे. मूळच्या बुलढाणा जिल्ह्यातील लोणार (बीबी) येथील असलेल्या भाग्यश्री सध्या आपल्या कुटुंबासह पाबळ येथील थोरस्थळ वस्तीवर राहत होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी भाग्यश्री आणि त्यांचे पती राजू पांडुरंग जाधव यांच्यात भांडण झाले होते. या वादानंतर चिडलेल्या आणि मानसिक तणावात असलेल्या भाग्यश्री आपल्या दोन्ही मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या. दुपारच्या सुमारास जेव्हा पतीने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली, तेव्हा परमेश्वर पिंगळे यांच्या शेतातील



विहिरीत चार महिन्यांच्या गौरीचा मृतदेह तरंगताना दिसला. या भयावह दृश्याने परिसरात खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने विहिरीकडे धाव घेतली असता, शोध मोहिमेनंतर भाग्यश्री आणि त्यांचा मुलगा सार्थक यांचेही मृतदेह विहिरीच्या तळाशी मिळून आले.

घटनेची माहिती मिळताच शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक तपासानुसार, पती राजू जाधव हा पत्नी भाग्यश्रीच्या चारित्र्यावर वारंवार संशय घेत असे. यावरून घरात रोज वाद उद्भवत होता. त्यातूनच मानसिक छळाला कंटाळून भाग्यश्रीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मृत महिलेची बहीण जयश्री सुनील जाधव यांनी याप्रकरणी शिक्रापूर पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# बारामतीत चोरटयांनी २५ लाखांचे दागिने केले लंपास; अजित पवार यांच्या अंत्यविधीप्रसंगी चोरटयांचा धुमाकूळ

**बारामती । प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यविधी दरम्यान चोरटयांनी किमान पंधरा जणांचे पंचवीस लाखांचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना बारामतीत घडली. या प्रकरणी पोलिसांनी सहा चोरटयांची धरपकड केली असून त्यांच्या साथीदारांचा शोध सुरु आहे. अजित पवार यांच्या अंत्यविधीप्रसंगी २९ जानेवारी रोजी लाखाचा जनसमुदाय उपस्थित होता. या प्रचंड गर्दीचा गैरफायदा घेत काही जणांच्या गळ्यातील सोन्याच्या चेन व दागिने चोरटयांनी चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. या पैकी काही चोरटयांना नागरिकांनी पकडून चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले तर काहींना पोलिसांनी पकडले.

विशेष म्हणजे त्या दिवशी बारामतीत आठ हजार पोलिसांचा



बंदोबस्त होता. ज्या विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर चोरटयांच्या टोळीने हात साफ करण्याचा प्रयत्न केला त्या ठिकाणी अक्षरशः हजारो पोलिस उपस्थित असतानाही धाडस दाखवित या चोरटयांनी चोरीचा प्रयत्न केला. बंदोबस्तात पोलिस असल्याचे पाहत चोरटयांनी पोलिसांसमोरच चो-यांचा प्रयत्न केल्याने लोक संतप्त झाले आहेत. या प्रकरणी बारामती तालुका पोलिसात आठ ते दहा तक्रारी दाखल झाल्याची माहिती पोलिस निरिक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली आहे. या मध्ये राजकुमार बाबूराव आठवले (रा.गेवराई, जि. बीड), महम्मद अनिस महमद युनुस, येजाज भग्गू मिरावले, मोहमद सादिक मोहमद सिराज (सर्व रा. दिग्रस, जि. यवतमाळ), बाळू बबन बोत्रे (रा. पळसदेव, ता. इंदापूर) व त्याचे दोन मित्र अशा संशयितांविरुध्द तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी रणजित बाबासाहेब जाधव व रमेश लालासाहेब वाबळे यांनी तालुका पोलिसात फिर्याद दिली आहे. दरम्यान विजया गजानन पवार यांचे गंठण, नीलेश लक्ष्मण काटे, अशोक मोरे, मनोहर जाधव, विजय शिंदे, जालिंदर बसले, संजय काटे, विश्वजित तुपे, सतीश सातकर, अमोल ताटे, अंकुश दिघे, प्रशांत सपकळ, विकास भागवत यांच्या गळयातील सोन्याची चेन चोरटयांनी चोरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. पोलिसांनी या चोरटयांकडे कसून तपास सुरु केला असून यातील सर्व सहभागी आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल असे चंद्रशेखर यादव म्हणाले.

# टीईटीचा अंतिम निकाल ३ फेब्रुवारीला; उत्तीर्णतेचा टक्का वाढणार

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटीचा अंतरिम निकाल उमेदवारांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. परंतु, अंतिम निकाल केव्हा लागणार? याबाबत उमेदवारांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता हा निकाल मंगळवारी ३ फेबुवारीला जाहीर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर यंदा निकालाचा टक्का देखील वाढणार असल्याची माहिती राज्य परीक्षा परिषदेतील सूत्रांनी दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सर्वच शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या टीईटीला प्रविष्ट होणाऱ्या उमेदवारांची संख्या चांगलीच वाढली. या परीक्षेसाठी राज्यभरातील ४ लाख ७५ हजार ६६८ उमेदवारांनी नोंदणी केली होती. राज्यातील १४२० परीक्षा केंद्रांवर या उमेदवारांची परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर परीक्षेची उत्तरसूची जाहीर केली, नंतर उमेदवारांना त्यांच्या लॉगिनमध्ये अंतरिम निकाल पाहण्यास उपलब्ध करून दिला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा




परीक्षेच्या निकालात सुमारे दहा टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, सीटीईटी परीक्षा जिल्हा परिषद निवडणुकांच्या प्रशिक्षणाच्या दिवशी येत असल्याने सीटीईटी परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी केली जात आहे. तर, सीटीईटीपूर्वी टीईटीचा निकाल जाहीर करावा, अशी अपेक्षा उमेदवारांकडून व्यक्त केली जात आहे. त्यानुसार परीक्षा परिषदेने टीईटीच्या अंतिम निकालाची तयारी पूर्ण केली आहे. प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न चुकल्यामुळे संबंधित प्रश्नांचा गुण वजा करून उमेदवारांचा निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे निकाल जाहीर करण्याच्या गुणोत्तरात बदल होणार आहे.

**नोकरी टिकविण्यासाठी टीईटी उत्तीर्ण आवश्यक**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शिक्षकांना नोकरी टिकविण्यासाठी तसेच पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे टीईटीत उत्तीर्ण होण्यासाठी सेवेत कार्यरत असणारे सर्वच शिक्षक प्रयत्न करीत आहेत. परीक्षा परिषदेकडून टीईटीचा अंतिम निकाल केव्हा लागणार, याची वाट सर्व उमेदवार पाहत आहेत. मंगळवारी निकाल जाहीर होणार असल्याने आपण उत्तीर्ण झालो किंवा नाही, हे सर्व उमेदवारांना समजणार आहे.

# तेरावा झाल्यानंतरच राजकीय चर्चा, रोहित पवारांनी राष्ट्रीय अध्यक्ष अन् व्हायरल व्हिडिओबाबत मांडली भूमिका

**नाशिक । प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील सुदाम बोडके हे अजित दादांचे आणि साहेबांचे कट्टर कार्यकर्ते आहेत. जेव्हा त्यांना अजित दादांच्या निधनाची बातमी कळली, तेव्हा अस्वस्थ झाले नंतर ते हॉस्पिटलमध्ये गेले आणि त्यांचा मृत्यू झाला. आज पवार परिवार आणि हा परिवार दुःखात आहे. त्यामुळे, मी बोडके कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, असे आमदार रोहित पवार (ठेहळीं झुरी) यांनी म्हटले. तसेच, ९ तारखेपर्यंत मी कुठलीही राजकीय चर्चा करणार नाही. अजित दादांच्या तेराव्याचा कार्यक्रम झाल्यानंतर मी राजकीय विषयावर भाष्य करेन, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

तेरावा ज्या दिवशी होईल, त्या दिवशी मी पत्रकार परिषद घेऊन सांगेल, आता राजकीय



बोलणे ते योग्य नाही. दादांसोबत काय चर्चा झाली, सगळ्या प्रक्रियेत मी होतो, मात्र तेरा दिवसांनी सांगेल, असे म्हणत रोहित पवारांनी व्हायरल झालेल्या व्हिडिओ अजित दादांसोबत काय चर्चा झाली, याबाबतचे बोलणे सध्यातरी टाळले. तसचे, सुनेत्रा पवार यांच्या शपथविधी सोहळ्यावरही रोहित पवारांनी परखडपणे भूमिका मांडली. अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा आहे, त्यामुळे उपमुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय घेताना पक्षाचे सुनील तटकरे, धनंजय मुंडे, छगन भुजबळ आणि प्रफुल पटेल होते. या नेत्यांची सुनेत्रा काकी यांच्याशी चर्चा झाली असेल, राजकारणात अनुभव कमी असला तरी त्या अनेक वर्षांपासून समाजकारणात काम करतात, असे रोहित पवार यांनी म्हटले. तसेच, शपथविधी होणार असल्याचे आम्हाला कोणालाही माहित नव्हते, लाखो लोक बारामतीमध्ये पवार कुटुंबाला भेटण्यासाठी येत होते. पार्थ देखील होता, संपूर्ण महाराष्ट्र येऊन भेटत नाही, सांत्वन करत नाही तोपर्यंत आपण बारामतीत थांबले पाहिजे. आम्हाला शपथविधीची बातमी देखील टीव्हीच्या माध्यमातून कळाली, असे म्हणत कुटुंबीयांना शपथविधी सोहळ्याची माहिती नव्हती, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

# पुण्यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षकाचे निधन; पोलिस दलात हळहळ

**पुणे । प्रतिनिधी**

लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सर्जेराव शामराव कुंभार (वय ५०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने शनिवारी मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास निधन झाले.

त्यांच्या आकस्मिक निधनाने पुणे ग्रामीण पोलिस दलासह वाघोली-लोणीकंद परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील चावरे या मूळगावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सर्जेराव कुंभार हे सध्या वडगावशेरी येथे वास्तव्यास होते. शनिवारी रात्री सुमारे दहा वाजता ड्युटी आटोपून ते घरी परतले होते. मध्यरात्री त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. तत्काळ त्यांना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.सर्जेराव कुंभार यांनी १२ ऑक्टोबर २०२४ रोजी लोणीकंद पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला होता. कर्तव्यदक्ष, शांत आणि संयमी अधिकारी म्हणून त्यांची ओळख होती. पेरणेफाटा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळयाच्या नियोजन आणि सुरक्षेची जबाबदारी त्यांनी सलग दोन वर्षे यशस्वीपणे पार पाडली होती. तसेच, वाघोलीचे तत्कालीन पोलिस निरीक्षक युवराज हांडे सुट्टीवर असताना २५ ते २७ जानेवारीदरम्यान लोणीकंद व वाघोली या दोन्ही पोलिस ठाण्यांचा अतिरिक्त कार्यभार त्यांच्याकडे होता.



# उत्पन्न लपविल्याबद्दल पतीला दणका; पत्नीला १० हजार अंतरिम पोटगी

**पुणे । प्रतिनिधी**

न्यायालयात खटला दाखल केल्यानंतर इन्कम टॅक्स रिटर्न शून्य दाखवत प्रतिज्ञापत्रासोबत बँक खात्याचे स्टेटमेंट जोडण्यास टाळाटाळ करणाऱ्या पतीला न्यायालयाने दणका दिला आहे. उत्पन्न लपविल्याचा ठपका ठेवत पत्नीला दरमहा दहा हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश शुभांगी यादव यांनी दिला. पूर्वीच्या प्रकरणात पोटगी चालू असतानाही पत्नी आणि मुलासाठी दरमहा दहा हजार रुपये देण्याचा आदेश न्यायालयाने दिला. मुलाच्या शिक्षणाच्या खर्चासह अभ्यासेतर उपक्रम, खासगी शिकवणीसह अन्य महत्त्वाच्या गोष्टींवरील खर्चाचा भार कमी होणार असल्याने पत्नीला दिलासा मिळाला आहे.



अनय आणि अनया (दोघांचीही नावे बदलेली) अशी दाम्पत्याची नावे आहेत. त्यांना अमन नावाचा मुलगा आहे. अनया आणि अमन हे अनयच्याच घरामध्ये स्वतंत्र मजल्यावर राहतात. त्यामुळे न्यायालयाने यापूर्वीच राहण्यासाठीचा खर्च लागू न करता पोटगीची रक्कम लागू केली आहे. २०२२ साली हा आदेश झाला आहे. त्यानंतर वाढलेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मुलाच्या खर्चाचा भार वाढल्याने तिने ड. संग्राम जाधव यांच्यामार्फत अंतरिम पोटगी मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयात प्रकरण दाखल करण्यापूर्वी मागील सात वर्षांपासून अनय हा इन्कम टॅक्स रिटर्न दाखल करीत होता.

मात्र, न्यायालयात खटला दाखल केल्यापासून त्याने इन्कम टॅक्स रिटर्न शून्य दाखविले आहे. याखेरीज प्रतिज्ञापत्रासोबत बँक खात्याचे स्टेटमेंट न जोडल्याने अनय हा उत्पन्न लपवीत असल्याचा दावा ड. जाधव यांनी पत्नीमार्फत केला. या वेळी नवऱ्याच्या विविध मालमत्ता आणि चारचाकी घरातील दुसऱ्या व्यक्तींच्या नावे करून त्याचा उपभोग नवरा घेत असल्याचा पुरावा तिने न्यायालयात सादर केला. त्यासाठी पतीच्या सोशल मीडियाचा आधार घेत त्याचे फोटोज तसेच कामाला चारचाकी घेऊन जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेज तिने न्यायालयासमोर आणले. पत्नीने न्यायालयात सादर केलेला पुरावा ग्राह्य धरत पतीप्रमाणे पत्नीचा देखील दर्जेदार जीवनशैली जगण्याचा अधिकार असल्याचे नमूद करीत न्यायालयाने अंतरिम पोटगीचा पत्नीचा अर्ज मंजूर केला.

# रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबारप्रकरणी पुण्यातून पाचजण ताब्यात, गँगस्टर बिश्नोई टोळीशी संबंधाचा संशय

**पुणे । प्रतिनिधी**

बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या मुंबईतील घरावर झालेल्या गोळीबारप्रकरणी पुण्यातील वारजे पोलिसांनी पाच संशयितांना रविवारी (ता. १) दुपारी ताब्यात घेतले. आरोपींना मुंबई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपींचा कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंध असल्याचा प्राथमिक संशय व्यक्त पोलिसांनी व्यक्त केला आहे.



मुंबईतील जुहू येथील रोहित शेट्टीच्या घरावर शनिवारी मध्यरात्री गोळीबार झाल्याची घटना घडली. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. दरम्यान, आरोपी पुण्यातील वारजे परिसरात असल्याची माहिती वारजे पोलिसांना मिळाली. त्यानंतर तातडीने पोलिसांनी पाचजणांना ताब्यात घेतले. अमन आनंद मारोटे (वय २७), आदित्य ज्ञानेश्वर गायके (वय १९, कर्वेनगर), सिद्धार्थ दीपक येनपुरे (वय २०, धायरी), समर्थ शिवशंकर पोमाजी (वय १८, धायरी) आणि स्वप्नील बंडू सकट (वय २३, रा. धायरी, पुणे) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. आरोपींच्या विरोधात यापूर्वी पोलिस ठाण्यात कोणताही गुन्हा दाखल नाही. आरोपींपैकी काहीजण मजुरीचे, हातगाडी व्यवसाय आणि वाहनचालक असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

# महाराष्ट्र साहित्य परिषद निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांचे रण पेटले

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महत्त्वाची साहित्य संस्था असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. निवडणुका म्हटल्यावर आरोप-प्रत्योरापांचा धुरळा आलाच. विद्यमान कार्यकारिणीचे परिवर्तन उत्कर्ष आघाडी पॅनेल, प्रतिस्पर्धी साहित्य संवर्धन आघाडी पॅनेल यांचा एकमेकांविरुद्ध हल्लाबोल सुरू आहेच. त्यात महाराष्ट्र साहित्य परिषद संरक्षण कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून आरोप होत आहेत. शनिवारी (दि. ३१) असेच आरोप-प्रत्यारोपांचे चित्र पाहायला मिळाले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा आणि सरकारी यंत्रणेचा वापर करून संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे प्रमुख विनोद कुलकर्णी यांनी शनिवारी (दि. ३१) पत्रकार परिषेदत केला. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणीही




कुलकर्णी यांनी केली आहे. तसेच, हस्तक्षेप करणाऱ्यांवर कारवाई करावी, असेही त्यांनी म्हटले आहे. या वेळी कुलकर्णी यांनी प्रतिस्पर्धी साहित्य संवर्धन आघाडीच्या प्रचारासाठी आयोजित ऑनलाइन बैठकीचे रेकॉर्डिंग पत्रकार परिषदेत दाखविले. या ऑनलाइन बैठकीमध्ये पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पाठिंब्याने साहित्य परिषद ताब्यात घेण्याचे विधान केल्याचा दावाही कुलकर्णी यांनी केला आहे. परिषदेच्या निवडणुकीत साहित्य संवर्धन आघाडी या नावाने राजेश पांडे यांनी पॅनेल उभे केल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

कुलकर्णी म्हणाले की, राजेश पांडे यांनी २६ जानेवारी रोजी रात्री ९ वाजता राजेंद्र नन्नावरे यांच्या निमंत्रणावरून आयोजित केलेल्या एका झूम मीटिंगमध्ये साहित्य संवर्धन आघाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पाठिंबा असल्याचा उल्लेख केला आहे. खरेतर मी मुख्यमंत्री असेपर्यंत साहित्य संस्थांची स्वायत्तता अबाधित राहील. कोणत्याही साहित्य संस्थेत सरकार लक्ष घालणार नाही किंवा हस्तक्षेप करणार नाही, असे फडणवीस यांनी त्यांच्या सातारा संमेलनातील भाषणात सांगितले होते. मात्र, संमेलन होऊन महिना होण्यापूर्वीच त्यांना खोटे ठरविण्याचा उद्योग सुरू आहे. विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नाव आले, त्या वेळी त्यांनी ज्याप्रमाणे तातडीने लेखी उत्तर दिले, त्याप्रमाणेच फडणवीस यांनी लेखी पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट करावी. योगेश सोमण यांच्या नावाने आपण पॅनेल करतो आहोत, हे या क्लिपमध्ये पांडे यांनी उघड म्हटलेले आहे. त्यामुळे योगेश सोमण यांच्यासह त्यांच्या पॅनेलच्या सर्व उमेदवारांना अपात्र करण्यात यावे, अशी मागणी आम्ही मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे. पांडे हे छुप्या पद्धतीने आणि पडद्यामागून या पॅनेलला पाठिंबा देत आहेत. साहित्य परिषद ताब्यात घेण्याची योजना आखत आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणुकीत हस्तक्षेप करणाऱ्या या प्रकाराची गंभीर दखल घ्यावी, असे पत्र निवडणूक अधिकाऱ्यांना परिवर्तन उत्कर्ष आघाडीने दिले असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. या परिषदेला प्रा. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार आणि डॉ. सतीश देसाई उपस्थित होते.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीतील साहित्य संवर्धन आघाडीच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या खासगी ऑनलाइन बैठकीचे (झूम मीटिंग बैठक) बेकायदा रेकॉर्डिंग करून त्याचे चित्रीकरण पत्रकार परिषदेत दाखवून बदनामी केल्याचा आरोप परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे उमेदवार विनोद कुलकर्णी यांच्यावर राजेंद्र नन्नावरे यांनी केला आहे. कुलकर्णी यांच्याविरोधात नन्नावरे यांनी जळगाव येथील सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल कली. संबंधित बैठकीत काहीही आक्षेपार्ह नसताना विनाकारण कुलकर्णी यांनी आपली बदनामी केली असून, गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याचा आरोप बैठकीच्या आयोजकांनी केला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

cmyk